चार

`अरुणोदया` चे अंतरंग

## चार

## 'अरुणोदया'चे अंतरंग

### बाबांची लेखनभूमिका.

लोकोत्तर कर्तृत्वाच्या युगपुरुषानेच आत्मचरित्र लिहावे, सामान्य माणसाने आत्मचरित्र लिहिणे व ते प्रसिध्द करणे ही गोष्ट उध्दटपणाची

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आहे. असे समज एकोणिसाव्या शतकात रूढ असल्यामुळे या काळात फारशी आत्मचरित्रे आढळत नाहीत. स्वभूमिकेचे समर्थन करावे म्हणून अथवा स्वकहाणीची सामाजिक उपयुक्तता ध्यानी आली म्हणून काहींनी आत्मनिवेदनात्मक लेखन केले आहे. त्यापैकी दादोबा पांडुरंग आणि बाबा पदमनजी यांची आत्मचरित्रे आपले लक्ष वेधून घेतात. हे दोघेही एकाच पठडीतून शिकलेले होते. दोघेही ख्रिस्ती मिशन-यांच्या सहवासात आले होते, मात्र उभयतांचे संस्कार आणि मनोभूमिका यामध्ये अंतर आढळते. दादोबांची प्रेरणा स्वधर्मातील दोष काढून टाकण्याची होती तर बाबांची भूमिका वैगुण्यांनी भरलेल्या स्वधर्माच्या त्यागाची व स्वतःला निर्दोष वाटलेल्या नव्या धर्माच्या स्वीकाराची होती.

दादोबा लोकहितार्थ वृत्तीने आपले विचार व अनुभव लिहून ठेवतात. त्यामुळे त्यांच्या आत्मचरित्राचे स्वरूप तपशीलवजा व माहितीप्रद झाले आहे. अव्वल इंग्रजी काळाचा संपूर्ण इतिहास नसला तरी त्या काळातील अनेक उलाढालींची बीजे या ग्रंथात सापडतील.[१]

बाबांनी स्विकारलेल्या विशिष्ट लेखनहेतूमुळेच `अरूणोदया` चे रंगरूप घडले आहे. बाबा आपल्या लेखनहेतूच्या संबंधात म्हणतात,[२] `आता हे पुस्तक लिहिण्याचा मुख्य हेतू सांगितला पाहिजे. तो हाच की एका दीन पाप्यावर इश्वराने जी परमदया केली तिचे वर्णन करावे.`

ख्रिस्तीधर्म स्वीकारल्यानंतर आणि स्वतःच्या आध्यात्मिक मनोधारणांची जडण घडण झाल्यानंतर बाबा हे लेखन करीत आहेत. पाप्यास आपल्याकडे ओढण्याच्या ईश्वराच्या आश्चर्यकारक उपायांची माहिती देण्यासाठीच बाबा लेखनास प्रवृत्त झाले आहेत. हे उपाय बाबा सिध्दांतरूपाने मांडत नाहीत, पत्ररूपाने सुचवित नाहीत तर इतिहासरूपाने म्हणजेच घडलेले वृत्तकथन करून सांगत आहेत.[३] यासाठीच त्या काळात न रूजलेला आत्मचरित्रासारखा वाङ्मयप्रकार स्वीकारावा असे त्यांना वाटले असावे.

धर्मांतरापर्यन्त पोहोचलेल्या स्वत:च्या मानसिक परिवर्तनाची कहाणी सांगताना त्यासाठी आवश्यक असणारी काळाची माहिती ते यामध्ये देतात इतकेच. मात्र त्यांना त्या काळाचा सामाजिक इतिहास अजिबात मांडावयाचा नाही. `हे केवळ मनोरंजनार्थ अथवा तीस-चाळीस वर्षांमागे महाराष्ट्र देशात सुधारणूक व विद्या ही कशी वाढत गेली याविषयी माहिती करून घेण्यास म्हणून लिहिले नाही `असे बाबांनी स्पष्टच सांगितले आहे.[4] `अरुणोदय` म्हणजे त्या काळाची सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक दृष्टीने माहिती मिळवण्यासाठी एक महत्वाचे संदर्भपुस्तक आहे, असे आज जरी वाटत असले तरी बाबांना त्याचे असे रूप अपेक्षित नव्हते हे त्यांच्या वरील उद्गारावरून दिसून येते. `ईश्वराने मला गाढ अंध:कारातून आश्चर्यकारक प्रकाशात कसे बोलाविले' याची कहाणी सांगण्याच्या हेतूनेच बाबांनी लेखणी हाती धरली आहे.

## `अरुणोदया`चे स्वरूप

`अरुणोदया`ची पहिली आवृत्ती इ.स.१८८८ मध्ये प्रसिध्द झाली. बाबांच्या बाप्तिस्म्याच्या ज्युबिलीच्या निमित्ताने म्हणजे इ.स.१९०४ मध्ये याची दुसरी आवृत्ती निघाली. याच्या दुसऱ्या आवृत्तीचे पुनर्मुद्रण त्यांच्या ४९ व्या पुण्यतिथीस, २९ ऑगस्ट १९५५ ला . झाले.

बाबांनी वयाच्या २४ व्या वर्षी म्हणजे इ.स.१८५४ मध्ये ख्रिस्तीधर्म स्वीकारला असला तरी इ.स. १८८७ त्यांनी `अरुणोदया`च्या लेखनाला प्रारंभ केला व लोकच ते पुरे केले. इतक्या दीर्घ कालावधीनंतर त्यांना आपला भूतकाळ साकार करावयाचा असल्यामुळे जुना पत्रव्यवहार, दिनचर्यालेख इ.चा आधार लेखनासाठी घ्यावा लागला.[5]

बाबांनी `अरुणोदया`ला जोडलेली प्रस्तावना वाचली की त्यांची

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

लेखनभूमिका व त्यामुळे लेखनाला आलेले विशिष्ट रंगरूप - यावर बराच प्रकाश पडतो. तेहेतीस वर्षानंतर बाबा येथे स्वत:च्या धर्मांतराची हकीकत सांगत आहेत, विशिष्ट हेतूतून पूर्वानुभवांची रचना करीत आहेत हे सहजच जाणवते. बाबांनी आपल्या धर्मांतरापर्यन्तच्या जीवनातील अनेकविध व असंख्य अनुभवांची साभिप्राय व सार्थ निवड केली आहे. जीवनात ज्या व जशा घटना घडत गेल्या त्यामागे देवाचा हात आहे अशी ईश्वरीनियोजन कल्पनायुक्त श्रध्दावृत्ती त्यांनी धारण केली आहे. म्हणजेच एका दृष्टीने त्यांच्या चोवीस वर्षांच्या आयुष्यक्रमात ज्या गोष्टी आपातत: घडत गेल्या, त्या गोष्टींची ईश्वरी नियोजन कल्पनेच्या द्वारा पुनर्रचना करून बाबांनी `अरुणोदय` वाचकांपुढे ठेविला आहे.

ख्रिस्ती धर्मातील आचार-विचार तेहेतीस वर्षांच्या प्रदीर्घ काळात हाडीमांसी घट्ट रूळल्यानंतर स्वत:चे पूर्वचरित्र बाबा लिहित आहेत. शिवाय बाबांच्या लेखनामागे एक उघड पारमार्थिक प्रयोजन आहे. पारमार्थिक प्रयोजनाचे प्रतिपादन करताना वयाबरोबर विकसित होणारा पारमार्थिक अनुभव लेखकाला उपयोगी पडत असतो, किंबहुना त्याचा उपयोग करणे लेखकाला टाळताच येत नाही. `अरुणोदया` च्या लेखनाबाबत नेमके हेच घडले आहे.

`अरुणोदया` च्या पहिल्या आठ प्रकरणानंतरचे नववे प्रकरण सिंहावलोकनाचे आहे. प्रारंभापासून फ्रीचर्च विद्यालयात प्रवेश घेईपर्यंतची हकिकत सांगितल्यानंतर ते भूतकालाचे अवलोकन करतात. हा शाळाप्रवेश म्हणजे बाबांच्या भावी जीवनातील धर्मगतीचे बीज आहे. त्यामुळेच त्यांना त्याआधीचा स्वत:च्या संभ्रमित मानसिक अवस्थेचे व त्याकाळातील पूर्वसंस्कारांचे सिंहावलोकन करावे असे वाटते. फ्रीचर्च विद्यालयात बाबा शाळागुरू व ख्रिस्ती मिशनरी यांच्या सहवासात येतात. त्यांच्या मनातील धर्मविषयक संभ्रम कमी होतो, व प्रकट धर्मांतरापर्यंत त्यांच्या मनाची तयारी होते. या अवस्थेत असताना बाबा `अरुणोदया` च्या पंधराव्या प्रकरणात पुन्हा सिंहावलोकन करतात. धर्मांतराच्या

निर्णयाप्रत `मी कसा व का आलो,` याचे चिंतन करतात. यानंतरची सोळा ते एकवीस ही प्रकरणे बाप्तिस्मा व तो घेतल्यानंतरच्या अनेक हकीकती सांगण्यासाठी खर्ची पडली आहेत. या सर्वांचे अवलोकन केल्यानंतर ध्यानी येते की `अरूणोदया` ची रचना तीन टप्प्यात सामावलेली आहे.

अ) प्रकरण १ ते ८ - सुधारणुकीपर्यन्तचा काळ
ब) प्रकरण १० ते १४ - प्रत्यक्ष सुधारणुकीचा काळ
क) प्रकरण १६ ते २१ - सुधारणुकीचा परिपाक व परिणामांचा काळ

`अरूणोदया` ला जोडलेल्या पुरवणीमध्ये डॉ. विल्सन, मिचेल, नारायण शेषाद्री यांचेबरोबरचा पत्रव्यवहार बाबांनी दिला आहे. शिवाय कृष्णशास्त्री साठयांच्या व्याख्यानानंतर `ज्ञानोदया` ला लिहिलेले पत्र, स्वत:च्या धर्मांतराआधी `धूमकेतू` कडे पाठविलेला खुलासा, त्याबद्दलच्या इतर नियतकालिकातील प्रतिक्रिया इ.गोष्टींचा त्यांनी पुरवणीत समावेश केला आहे. `मी केलेले धर्मांतर कसे आवश्यक, अपरिहार्य व माझ्या प्रामाणिकपणाचे धोतक होते` हे पटविण्यासाठीच त्यांनी हे सारे पुरावे जोडले आहेत.

बाबांनी पत्करिलेल्या या दृष्टीकोणामुळेच `अरूणोदया` ची शैलीही निश्चित झाली आहे. स्वत:च्या बालपणीचे धार्मिक, सामाजिक वातावरण, हिंदू धर्मातील विविध विसंगती,कर्मकांडाचे पराकोटीला पोहोचलेले अवडंबर, मानवता व नैतिकतेचा झालेला -हास या सर्वांचे वर्णन त्यांनी प्रारंभी केले आहे.ते वाचत असताना बाबांची धर्मचिकित्सा करणारी बुध्दी सत्य, नीति, पावित्र्य यांची भुकेली आहे असे जाणवत राहाते. हिंदुधर्मातील वैगुण्यांनी विटलेले बाबांचे मन मिशनऱ्यांच्या सौजन्य, सेवाभाव, नैतिकता या गुणांमुळे ख्रिस्ती धर्माकडे आकर्षित होते. नंतर निर्णयासाठी मानसिक अवस्थेच्या अनेक रात्री घालविल्यानंतर बाबा बाप्तिस्मा घेतात आणि ही कहाणी संपते. `अरूणोदय` ही पूर्वनिश्चित लेखनहेतूची योजनापूर्वक केलेली मांडणी आहे.

त्यासाठी त्यांनी कांही प्रमाणात भूतकाळाची पुनर्रचनाही केली आहे असे जाणवते.

कर्त्याच्याही न कळत झालेला चमत्कार

हिंदू संस्कारांमुळे आपण एका फसव्या पाखंडात हुतको होतो, या खंतीने बाबा या पाखंडाचे वर्णन करावयास बसले असले तरी त्याचे उपहास उपरोधाने भरलेले प्रचारकी चित्र न रेखाटता बाबांनी वाचकाला जणू त्या कांचा प्रत्ययच दिला आहे. पापमुक्तिसाठी व आत्मोध्दारासाठी बाबांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला असला तरी `अरूणोदय` हा कांही आपल्या पापाची कबुली देणारा बटबटीत व निंदाव्यंजक आढावा नव्हे. धर्मांतराबद्दलची कैफियत सांगण्यासाठी बाबा येथे आपल्या भूतकाळाचा आलेख काढत असले तरी त्यांच्या न कळत येथे एक चमत्कार झाला आहे. मनाच्या प्रांजळपणामुळे या लेखनाला निरामयतेचा स्पर्श झाला आहे.

समाजदर्शन

साहित्य आणि समाज

व्यक्तीचे आंतरिक व व्यक्तिनिष्ठ विश्व हे जरी साहित्यिक अनुकृतीचा विषय ठरत असले तरी साहित्य हे त्यापुढे जाऊन `जीवना` चे प्रतिनिधित्व करीत असते आणि जीवन हे बव्हंशी एक सामाजिक वास्तवच असते.[6] सामाजिक वास्तव, साहित्यिक आणि साहित्यनिर्मिती यांच्यामधील परस्परसंबंधांचा विचार करताना ध्यानी येते की, साहित्यामधून समाजाचे जे प्रतिबिंब प्रकट होते ते साहित्यिकाच्या व्यक्तिमत्वाच्या माध्यमातूनच. म्हणूनच साहित्याच्या एकंदर निर्मितीप्रक्रियेत साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वाला अतिशय महत्व असते.

कारण त्याचा संबंध जसा कलाकृतीशी असतो तसा समाजाशीही येत असतो. सृजनाच्या प्रक्रियेत समाज, साहित्यिक आणि साहित्यकृती परस्परांना अशा त-हेने प्रभावित करीत असतात की तिघांच्याही परिवर्तनाची व विकासाची प्रक्रिया त्यातून वेग घेते. समाजापासून साहित्यिक, साहित्यिकापासून त्याची साहित्यकृती व त्या साहित्यकृतीकडून समाज असे हे चक्र असते.

मानवी जीवन म्हणजे अनेक संबंधांचे, रूढींचे, ताणतणावांचे, वैयक्तिक स्वरूपाच्या अनेक क्रिया-प्रतिक्रियांचे जाळे असते. ज्याचे प्रतिबिंब साहित्यकृतीत अपरिहार्यपणे उमटत असते. कोणताही साहित्यिक अज्ञात पोकळीत दडी मारून बसत नाही. तो भोवतालच्या वास्तवाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे संबंध ठेवून असतो, त्या संबंधांचाच अविष्कार त्याच्या लेखनात अपरिहार्यपणे होत असतो.

<u>आत्मचरित्रातील समाजदर्शन</u>

इतर वाड्.मयप्रकारापेक्षा आत्मचरित्रातील समाजदर्शनाचे रूप भिन्न असते. इतर कोणत्याही कलावंताप्रमाणेच आत्मचरित्रकारही आत्मदर्शन घडवीत असला तरी त्यासोबतच तो आपल्या जीवनकर्तृत्वाचा इतिहासही सांगत असतो. त्याचे कर्तृत्व ज्या क्षेत्रात घडले असेल त्या क्षेत्रातील समकालीन घडामोडी व त्यामधील त्याचा सहभाग यांचे आवश्यक ते वर्णन आत्मचरित्रात येणे अपरिहार्य असते. यामुळेच समकालीन धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक वास्तवाचे घटकांश आत्मचरित्रात उपस्थित असतात.

तटस्थ अवलोकन व वास्तवाचे दर्शन ही बंधने आत्मचरित्रकाराला पाळावी लागत असल्यामुळे ` स्व ` विषयी सांगत असतानाही त्याने घडविलेले ` स्वे ` तर दर्शन बरेच यथार्थ असण्याची शक्यता असते. भूतकाळाची पुनर्मांडणी करीत असताना आत्मचरित्रात वास्तवाचे विकृत प्रस्तुतिकरण

होऊ नये असा सामान्य संकेत असतो. यामुळेच आत्मचरित्रातील समाजदर्शन अगदी तंतोतंत नसले तरी अविकृत असते असे म्हणावयास हरकत नाही.

नाटक, काव्य, कादंबरी इ. वाङ्मय प्रकारात लेखक जसा व जितका कल्पनाविहार करू शकतो तसा आत्मचरित्रकार करू शकत नाही. त्याला चित्रण करावयाचे नसते तर दर्शन घडवायचे असते.

आत्मचरित्र हा एका अर्थी अनुभवग्रंथ असतो. मानवी समाजाचा विकास हा ज्ञानसंरक्षण व ज्ञानसंवर्धनावर अवलंबून असतो. आत्मचरित्र लिहून आत्मचरित्रकार हा जणू आपल्या अनुभवज्ञानाचे संरक्षण करीत असतो आणि इतरांना अनुभव-संवर्धनाची दिशा दाखवित असतो. आत्मचरित्रकार हे सर्व हेतुत: करीत नसला तरी सामाजिक दृष्टीकोनातून पाहाता त्याच्या लेखनाची हीच फलश्रुति असते.

आत्मचरित्रातून सामाजिक इतिहासाची रूपरेषा हाती येणे अशक्य नसते. परंतु या दृष्टीकोणातून अवलोकन करीत असताना, आत्मचरित्र हे केवळ जीवनाचा आरसा असते असे गृहित धरून चालणार नाही. आत्मचरित्रकाराच्या मानसिक पातळीचे भान आणि त्याने घडविलेल्या सामाजिक दर्शनाचे प्रत्यक्ष सामाजिक वास्तवाशी असणारे नाते कसे व कोणते आहे हे जाणण्याची दृष्टी आपणास प्राप्त झाली तरच अशा अवलोकनास अर्थ प्राप्त होईल.

## 'अरूणोदया' तील समाजदर्शनाचे स्वरूप

'अरूणोदया' त एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील समाज जीवनाचे एक ठळक प्रतिबिंब जाणवते. स्वत:च्या जीवनातील धार्मिक बदलाची कहाणी सांगण्याच्या हेतूने येथे बाबांनी लेखणी हाती धरली आहे. धर्म आणि समाज यांचे संबंध अन्योन्य वा परस्परपूरक असल्याकारणाने बाबांच्या या

कहाणीत समाजजीवनाचे दर्शन अपरिहार्य आहे.

`अरुणोदया` तील `स्वे` तर विश्व आपणास का उभारावे लागले याचा खुलासा करताना बाबांनी म्हटले आहे की,[७] `सन १८३१ पासून १८५४ पर्यन्त ज्या ज्या विशेषा गोष्टींशी व व्यक्तींशी माझा निकट व दूर, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध होता त्या गोष्टींचे व व्यक्तींचे विषयाच्या योग्यतेप्रमाणे स्वल्प किंवा सविस्तर वर्णन केले आहे` याचा अर्थच असा की, बाबांपुढे सामाजिक इतिहास लिहिण्याचे प्रयोजन नाही. त्यामुळे त्या विषयी कांही अनुल्लेख वा जाणिवपूर्वक उल्लेख यावा किंवा विशिष्ट, पक्षपाती दृष्टीकोणातून समाजजीवनाचे चित्रण घडवावे, असा येथे प्रश्नच उद्भवत नाही. आपल्या धार्मिक बदलाची कहाणी निवेदन करण्याकडेच बाबांचे अधिक लक्ष असल्यामुळे समाजजीवनाच्या संदर्भांना वेगळा रंग देण्यास त्यांना अवसरही मिळालेला नाही. त्यामुळे तत्कालीन समाजजीवनाचे येथे घडविले गेलेले दर्शन विश्वसनीय मानण्यास हरकत नाही. शिवाय बाबा एक धर्मचिंतक होते, सामान्य माणसापेक्षा त्यांच्या धारणा उच्च होत्या, त्यांची वृत्ती ध्येयवादी होती - हे सारे लक्षात घेता `अरुणोदया` तील समाजदर्शनाची विश्वासार्हता अधिकच जाणवते.

पटलेल्या ध्येयाचा पाठपुरावा करून ते स्वीकारण्यात बाबांचे आयुष्य खर्ची पडले होते. तत्कालीन समाज, धर्म, संस्कृती यांचे समीक्षण करून सत्य व नीति यांची रूपे शोधण्यात बाबा आयुष्यभर दंग होते. त्यामुळेच त्यांचे हे आत्मचरित्र तत्कालीन समाजजीवन, त्यातील वेगवेगळे प्रवाह, त्यांना गती देणाऱ्या व्यक्ती, त्यांच्या मतांचे व कार्याचे बरेवाईट पडसाद, यापासून अलिप्त राहू शकत नाही.

समाजदर्शन घडविण्याची भूमिका नसतानाही `अरुणोदया` तून

जाणवणारे समाजदर्शन हे बाबांच्या व्यक्तिमत्वाचा एक सहजरम्य अविष्कार आहे. तो त्यांच्या भावजीवनाचा एक भाग आहे. माहितीच्या तपशिलाच्या रूक्ष तुकड्यांनी हे समाजजीवन साकारत नाही, उलट त्याविषयीच्या बाबांच्या प्रतिक्रियांमुळे अधिक सजीव, चैतन्यमय होऊन जाते.

धार्मिक वातावरण
-------------

या काळात कर्मकांड, अंधश्रध्दा, व्रतवैकल्य यांचे प्राबल्य होते. नव्या शिक्षणामुळे काहींच्या अंधश्रध्दा डळमळीत होऊन त्यांची चिकित्सकता वाढली असली तरी सर्वसामान्यांत गतानुगतिकचेच वर्चस्व होते. सोवळ्या-ओवळ्याच्या कल्पना इतक्या पराकोटीला गेल्या होत्या की त्यातील इष्टानिष्टविवेकही नाहीसा झाला होता. जेवताना सोवळ्याचे वस्त्र नेसावे लागे. नवा जोडा वापरताना त्यावर गवताची काडी टाकून त्याचे शुध्दीकरण केले जाई. बाजारात शूद्राचा स्पर्श झाल्यास वस्त्रांसह स्नान करून पवित्र व्हावे लागे. बाबा जातीने कासार असले तरी त्यांच्या कुटुंबातील कर्मठ वातावरण कोणत्याही ब्राम्हणी कुटुंबाला लाजविणारे होते.

सरकारी खात्यात काम करणाऱ्या एका वैष्णव ब्राम्हणाचा लाचखाऊपणा व त्या पैशातून केला जाणारा देवपूजेचा डामडौल, याकडे ते विचक्षण दृष्टीने पाहातात. कोटिलिंगार्चन व त्यातील खोटारडेपणा, शंकराचार्यांचे प्रस्थ, संकटकाळी ब्राम्हण अनुष्ठानास बसविण्याची प्रथा, अंगात वारे येणे व त्यातून उद्भवणारे गैरसमज याही गोष्टींचे वर्णन त्यांनी केले आहे. होळीच्या दिवसात चोरी करणे व दिवाळीत जुगार खेळणे हे प्रतिष्ठितपणाचे समजले जाई. धर्म आणि अनीति यांची सांगड घालून भ्रष्टाचारास शिष्ट केले जाई. ज्या मुंबई शहराला नवे पश्चिमी वारे प्रथमत: भिडले होते तेथेही ढोंगी धर्माचारांचा कळस झाला होता. ढेकूण, पिसवांना पोसण्याकरिता भाडोत्री

माणसाला पांजरपोळात झोपविले जाई. यामधील नैतिक विसंगती मात्र कोणाच्याही ध्यानी आली नव्हती.

देवाला कौल लावणे, अंगात वारे येणे हे प्रकार सर्रास चालत. ज्योतिषी, मांत्रिक, पंचाक्षरी यांचा समाजमनावरील प्रभाव जबरदस्त होता. यासंबंधात बाबांनी केलेला एक छोटासा उल्लेख अतिशय बोलका आहे. एका पंचाक्षऱ्याच्या सांगण्यावरून बाबांच्या कुटुंबातील कोणीतरी आपल्या वैऱ्याचा पिठाचा पुतळा करून जाळत. तो सहा महिन्याच्या आत मरावा हा यामागील उद्देश असतो. परंतु प्रत्यक्षात मात्र तो अनेक वर्षे जगतो. तरीही अनेकांचा अशा अघोरी उपायांवर भरवसा असे. समाजाचे जे सांस्कृतिक नेते - भटभिक्षुक - ते नीतिच्या उपदेशापेक्षा पोथीपंचांगाच्या आधारे लोकांच्या अंधश्रध्देचा फायदा घेत असत. आपल्या सल्याने कुणाचे, कसे अकल्याण होते याचा साधा विवेकही त्यांनानसे. बाबांचा मेहुणा आजारी असताना त्याच्या बायकोस बरीच धार्मिक व्रते करावयास सांगितली जातात. ब्राम्हणाच्या सांगण्यानुसार त्याला औषधपाण्यापासून दूर ठेविले जाते. याचा व्हायचा तोच परिणाम होतो. अंधश्रध्दा व त्यामधील भयानकत्व अजूनही समाजाला विचारप्रवृत्त करू शकले नव्हते.

## आर्थिक स्थिती

इंग्रजांच्या आगमनामुळे प्रशासन व शाळाखात्यातील नोकरांचा एक नवा वर्ग समाजात उदयाला आला होता. इंग्रजी शिक्षणपध्दतीमधून शिकलेले ब्राम्हण व वरच्या जातीच्या लोकांचा यात समावेश होता. राज्याच्या स्थैर्यासाठी या वर्गाला खूष ठेवण्याचे सरकारचे धोरण होते. समाजाच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन भ्रष्टाचाराला उधाण आणणारे बरेच जण यामध्ये होते. त्यामुळे शेतकरी, मजूर, कामगार यांचे शोषण चालू होते. ' ब्राम्हणांच्या

घरी तूपपोळ्यांच्या समाराधना चालत आणि त्यांच्या दारापुढे महार, मांग, भिकारी इ. लोक उष्ट्या पत्रावळीसाठी याचना करताना दिसत. आर्थिक विषमता पराकोटीची होती. स्वस्ताई खूपच होती. रुपयाला चौदा पायली तांदूळ मिळत. सर्वसामान्य माणासाच्या पोटाला दरमहा एक रुपया पुरा पडे. असे असले तरीही लोकांच्या हाती पैसा खेळण्यास वाव नव्हता.

ऐहिक कल्याण व त्याची साधने यांचा विचार करण्यापेक्षा ख्रिस्ती धर्मानुकूल मानसिक उन्नती महत्वाची मानणाऱ्या बाबांना तत्कालीन आर्थिक स्थिती व तिचे बरेवाईट परिणाम जाणवले नसावेत. जरी जाणवले तरी त्यांचा निर्देश करण्याचे त्यांनी टाळले असावे असे वाटते.

## जीवनधारणा आणि लोकसमजुती

बेळगावात बाबा ज्या मारुती आळीतील ब्राम्हणवस्तीत राहात असत, तेथे सातत्याने समाराधना चालत. फेकलेल्या उष्ट्या पत्रावळीवर महारामांगांची झुंबड उडे. हे दृष्य पाहून सामाजिक समतेच्या भूमिकेतून विचारप्रवृत्त होण्याचे बाबांचे वय नव्हते. ' ही त्यांच्या पूर्वजन्मीच्या पापांची फळे ' हाच विचार त्यांच्या बालमनात येत असे.

देवपूजेसाठी फुले चोरण्यात कुणालाही पाप वाटत नसे. विचार आणि आचारातील संगतीचा शोध घेण्याची कुणाची वृत्ती नव्हती. गृहस्थाश्रमातील कर्तव्य म्हणून म्हणा किंवा ' दया धरमका मूल है ' म्हणून म्हणा दारात येणाऱ्यास मदतीवाचून पाठविले जात नसे. ब्राम्हणांस तांदूळ, गोसाव्यांस पीठ, इतरांना निदान मूठ मूठ बाजरी घातली जाई.[1]

अंगात वारे येणे वगैरे गोष्टीवर लोकांचा अतोनात विश्वास असे. भगताकडून करणी, बळी, उतारे सांगितले जात. यात द्व्यवसाय होईच पण

भगत ज्यांची नावे सांगत त्यांवर संशय घेऊन द्वेष, वैर, भांडणे वाढत. ब्राम्हणांनी सांगितलेल्या धर्माचारांवर केवळ हिंदूंचाच नव्हे तर पारशांचा देखिल विश्वास असे.[१०] एकदा बेळगावातील एका प्रख्यात पारशी व्यापा-यावर काही संकट आले असता, ते निवारण्यासाठी त्याने बाबांच्या वडिलांमार्फत अनुष्ठानास ब्राम्हण बसविले होते. त्यांना नित्य खीरपुरीचे जेवण व आठ आठ आणे दक्षिणा दिली जाई. तत्कालीन जीवन केवळ धर्माच्या प्रभावाखाली होते हेच यामधून जाणवते.

नटाकडे व नाट्यप्रयोगाकडे पाहाण्याची समाजाची भूमिका, यावर प्रकाश टाकणारा त्रोटक उल्लेख बाबांनी केला आहे.[११] कर्नाटकी ब्राम्हण स्त्रियांची सोंगे घेत म्हणून त्याना नीच मानले जाई. नाट्यप्रयोगासाठी स्वतंत्र नाट्यगृहे नसत. देवळाच्या आवारात किंवा गावाच्या चावडीत पारंपरिक पध्दतीने नाटके सादर केली जात.

कोणी समाजविरोधी वर्तन केल्यास त्यांस नमविण्यासाठी जाति-बहिष्काराचे शस्त्र प्रभावी होते. बाबांचे वडील पद्मनजी माणिकजी एडन येथे आरबाच्या हातचे पाणी प्याले. यासाठी काही कुटाळखोरांनी बाबांच्या लग्नात विघ्न आणण्याचा डाव रचला, वाळीत टाकण्याची धमकी दिली व लग्नातील जेवणावळीवर बहिष्कारही घालण्याचे त्यांनी ठरविले. शेवटी पाणीपुरवठयाच्या कामाची जबाबदारी स्वत:वर होती याची कागदपत्रे पदमनजींनी नातलगांना दाखविली आणि मग सर्व सुरळीत झाले. जाति-बहिष्काराचे शस्त्र भल्याभल्यांनाही घाबरवून सोडत असे म्हणूनच बाबांचे वडील बाबांना - 'घरात कसाही वाग पण उघड ख्रिस्ती होऊ नकोस' असा उपदेश वारंवार करताना आढळतात.

## कौटुंबिक जीवन

बाबा जेथे वाढले त्या कुटुंबाचे, त्या कुटुंबघटकांमधील परस्परसंबंधाचे चित्रण त्यांनी केले आहे. बाबांचे कुटुंब त्या काळातील प्रातिनिधिक स्वरूपाचे वाटत नाही. कारण बाबांचे वडील इंजिनिअर होते. त्यांना भरपूर पगार व समाजात प्रतिष्ठा होती. नवे स्वीकारण्याचा त्यांचा प्रयत्न होता. यामधूनच बाबांना मिशन स्कूलमधील शिक्षण उपलब्ध झाले होते. लग्नाचेवेळी बाबांना वधूच्या पसंतीबद्दल वडिलांकडून विचारणा होते, हा उल्लेखही याच सुधारणानुकूल वातावरणाचा द्योतक वाटतो. असे असले तरी घरातील सर्वांचा कर्मकांड, व्रतवैकल्ये, भुते, चेटुक इ. वर अतोनात विश्वास होता. खुद्द बाबांच्या अंगी बेळगावचा खवीस येऊ लागल्याने, अडचणीच्या परिस्थितीतही त्यांना एडनहून भारतात पाठविले जाते व खविसाची शांती केली जाते.

बाबांनी आजोबा व वडील यांच्यामधील वैमनस्याचे वर्णन केले आहे. कठोर धर्माचरण पण एकमेकांचे अनिष्ट चिंतन ही दोघांची वर्तन विसंगती बाबांनी टिपली आहे. खाद्यपदार्थ, वस्त्रालंकार, मानपानाबद्दल भांडणे हे प्रत्येक घराचे चित्र असल्याचे ते सांगतात. ब्राम्हणांस दानधर्म, पोथ्या पुराणाचे वाचन, मूर्तिपूजा व तीर्थयात्रेचे फळ म्हणून कोणत्याही कुटुंबात समाधान व सुख दिसत नव्हते. एखाद्या कुटुंबात सामंजस्य असेल तर ते त्या कुटुंबियांच्या विवेकाचे, सुस्वभावाचे, साधुसंतांच्या बोधपर ग्रंथवाचनाचे फळ होय अशी तत्कालीन कौटुंबिक स्वास्थ्याची मार्मिक मीमांसा त्यांनी केली आहे.[१२]

## शिक्षणपध्दती आणि शाळा

ब्रिटिशांनी आपल्याबरोबर आणलेली शिक्षणपध्दती ऐहिक स्वरूपाची होती. पण ती राबविण्यामागे त्यांचा धर्मप्रसाराचा प्रच्छन्न हेतू होता.

त्याच्या इष्टानिष्ट परिणामांचे येथे दर्शन घडले. तसे पाहिले तर हा सामाजिक अंधाधुंदीचा काळ होता. सर्वच बाबतीत जुने सुटले होते आणि नवे आत्मसात करण्याची ताकद नव्हती. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी बरोबर हेच हेरून, शिक्षणप्रसाराच्या नावाखाली स्वधर्माची पाळेमुळे रुजविण्याचे भगीरथ प्रयत्न केले. सरकारी शाळा व ख्रिस्ती मिशनऱ्यांनी चालविलेल्या शाळा यांच्या कार्यपध्दतीमधील फरक यामुळेच जाणवण्यासारखा होता. सरकार धर्मप्रसारास अनुत्सुक होते असे नव्हे, तर त्यामुळे आपल्या राज्ययंत्रणेला प्रजेच्या असंतोषाचे हादरे बसतील ही भीती त्याला वाटत होती.

बाबांचे शिक्षण बेळगावातील सरकारी मराठीशाळा व बेळगांव मिशनस्कूलमध्ये झाले. मुंबईतील एलफिन्स्टन स्कूल व फ्रीचर्च विधालय या शाळांचेही ते विधार्थी होते. बाबांनी या शाळांचे, तेथील वातावरणाचे पुढीलप्रमाणे मार्मिक वर्णन केले आहे.

बेळगावातील प्राथमिक शाळेतील अभ्यास म्हणजे धुळाक्षर, कित्ते वळवणे, खर्डे लिहिणे, मोडी कागद वाचणे अशा स्वरूपाचा होता. मुलांना उठाबशा, घोडीवर चढविणे इ. शिक्षा दिल्या जात. शाळेत घडयाळ नसल्यामुळे सावलीच्या खुणांवरून शाळा भरत व सुटत असे.

बेळगावातील मिशनच्या शाळेतील वातावरण, रे. टेलर व रे. केनन यांचा सहवास बाबांना मार्गदर्शक ठरला. जो विधार्थी चोरी करी किंवा अभ्यासात चुकारपणा करी त्याला ` डन्सकॅप ` घालून सर्व वर्गात फिरवीत. मुलांचे नैतिक वर्तन सुधारण्यासाठी ही प्रभावी शिक्षा होती. स्वतंत्र लेखनास प्रवृत्त करण्यासाठी मुलांना निबंध लिहून आणावयास सांगितले जात असत आणि मुलांच्या देखत ते तपासले जात असत. विधार्थ्यांस इंग्रजीत मजकूर लिहिण्यास व त्यांचे विचार वाढविण्यास ही चांगली युक्ती होती.

एलफिन्स्टन स्कूल ही मुंबईतील सरकारी शाळा होती. तिथे बाबांना प्रो.दादाभाई नौरोजी, महादेवशास्त्री कोल्हटकर या शिक्षकांचा सहवास लाभला. या शाळेत धर्मचर्चेशिवाय फक्त अभ्यासक्रम शिकविण्याकडे लक्ष दिले जाई. ख्रिस्ती धर्माकडे ओढ घेणाऱ्या बाबांना त्यामुळे या शाळेचे आकर्षण वाटले नाही.

डॉ. विल्सन या मिशनऱ्याच्या प्रेरणेने चालविलेल्या फ्रीचर्च विद्यालय या शाळेला बाबांच्या जीवनात एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. रे.शेषाद्री, रे.मिचेल, रे.नेस्बिट यांसारख्या हुषार, कष्टाळू व ममताळू शिक्षकांचा प्रभाव बाबांच्या संवेदनाक्षम मनावर उमटला. रे.शेषाद्रींनी या शाळेत मुलांच्या अपराधांची चौकशी करण्याचे एक कोर्ट चालविले होते. त्यांच्याच प्रेरणेने मुलांनी एक परोपकारी मंडळी स्थापिली होती. फ्रीचर्च शाळेचे हे सारे वातावरण सेवाभाव, सौजन्य, शिस्त, बंधुभाव यांनी युक्त असे होते. गणित व रसायनशास्त्राचे तास वगळून इतर सर्वच तासांना थोडीबहुत तरी धर्म चर्चा चालत असे. सकाळी व सायंकाळी धर्मोपदेश चाले. शिवाय रोज एक तास बायबल शिकविले जाई. फ्रीचर्च शाळेचे हे वातावरण हा बाबांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे त्यांनी याचे अतिशय सविस्तर वर्णन केले आहे.

त्या काळातील शाळांमधून शिकविला जाणारा अभ्यासक्रम व शिक्षेचे प्रकार, गुरूदक्षिणा देण्याची व सरस्वती पूजनाची प्रथा, शिक्षकांचा विद्यार्थ्यांशी असणारा निकटचा व सततचा संपर्क, श्रीमंतांच्या मुलांना घरी शिकवावयास येणारे शिक्षक व त्याचे लाभालाभ इ. बारकाव्यांसह बाबांनी त्या काळातील शैक्षणिक वातावरणाचे चित्र रेखाटले आहे.

धर्मविषयक विविध मतप्रवाह

नव्या शिक्षणाचा परिणाम म्हणूनच की काय नव्या जागृतीचे लोण

समाजाच्या धर्मविषयक विचार-क्षेत्रात पोहोचले होते. धार्मिक बाबतीत संघर्ष, समन्वय व सुधारणा यांचा हा काळ होता. धार्मिक जीवन म्हणजेच एकूण मानवी जीवन असे मानणाऱ्यांचा हा काळ असल्यामुळे धर्मसुधारणा म्हणजेच समाज सुधारणा असे समजले गेले. बाबांनी या काळाचे रेखाटलेले चित्र त्यांच्या पश्चातबुध्दीतून निर्माण झाले असले तरी कालखंडाच्या आकलनासाठी मोलाचे आहे.

ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराच्या अतिरेकी प्रयत्नांमधूनच श्रीपत शेषाद्री सारखी प्रकरणे निर्माण झाली होती. धर्मसुधारणा, आणि धर्मांतर यातील फरक अजून लोकांना कळत नव्हता म्हणूनच ' परमहंस मंडळी ' च्या बोभाट्यानंतर मुंबईतील जनजीवन ढवळून निघाले. आपले पाल्य ख्रिस्ती होतील या भीतीने पालकांनी त्यांना शाळेतून काढून मुंबईबाहेर धाडले. बाबांचा स्वानुभव असाच होता. काही मोजके नवशिक्षित ख्रिस्ती मताकडे आकर्षिले होते तरी सर्वसामान्य माणूस स्वधर्माला चिकटूनच होता. भंग्याची टोपली उचलणे व ख्रिस्ती होणे एकच हे बाबांच्या वडिलांचे उद्गार [१३] लोकांच्या समजुतीचे द्योतक आहेत. सुधारलेला म्हणजे स्वधर्माबाबतची श्रध्दा लोपलेला, परधर्माभिमानी असे समजले जाई. ' सुधारक ' या शब्दाला असे कुचेष्टेचे, स्वत्वाच्या शून्यतेचे वलय होते. त्यामुळे बाबा स्वत:ला ही उपाधी लावून घेण्यास घाबरत असत.

इ.स.१८५० मध्ये भारतीय कायदेमंडळाने धार्मिक स्वातंत्र्याचा कायदा मंजूर केला. त्यानंतर स्वधर्मियांच्या जाहीर प्रचारसभा सुरू लागल्या. मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यावर विष्णुबुवा ब्रम्हचारी यांचे ख्रिस्ती मिशनऱ्यांबरोबरचे वादविवाद रंगू लागले. या कायद्याचा विशेष लाभ ख्रिस्ती मिशनऱ्यांनी घेतला. रे.जॉर्ज बोवेन व रे. नारायण शेषाद्री हे दोघे मिशनरी मुंबईतील प्रमुख रस्त्यावरून जाहीर उपदेश करीत. परंतु त्यांना कोणी त्रास देत नसे. या

ख्रिस्ती प्रचारलाटेचा परिणाम म्हणून नवशिक्षित एकदम परधर्माकडे ओढले गेले नाहीत पण स्वधर्मातील मूर्तिपूजा व जातिभेद मोडण्याबद्दल त्यांच्यामध्ये फारसे दुमत राहिले नाही. जातिभेद मोडण्याची कल्पना पश्चिमी उदारमतवादाचे वारे प्यालेल्यांना मारून टाकीत असे. परंतु सामाजिक बहिष्काराच्या बडग्यामुळे प्रत्यक्षात तसे वागण्यास लोक बिचकत असत. बाबांनीही आपल्या हिंदू मित्रांसमवेत जातिभेद मोडला असला तरी हे जाहीरपणे कबूल करण्याचे धैर्य त्यांना झाले नाही.

इतर चळवळी
---------

`अरुणोदया` च्या लेखनामागील हेतू ध्यानी घेता बाबांकडून ख्रिस्ती मिशन-यांच्या उद्योगांचे सविस्तरपणे वर्णन केले जाणे हे स्वाभाविकच आहे. मुंबई हे त्या काळी ख्रिस्ती मिशन-यांच्या चळवळीचे एक प्रमुख केंद्र होते. डॉ. विल्सन यांच्या प्रभावी व निर्भय व्यक्तिमत्त्वामुळे मुंबईतील ख्रिस्ती केंद्राचा सर्व भारतात बोलबाला झाला होता. डॉ. विल्सन आंब्रोळी मिशनगृहात एक व्याख्यानमाला चालवित असत. त्यात अनेक धर्मांचे तुलनारूप वर्णन करून शेवटी ख्रिस्ती धर्माचे श्रेष्ठत्व सांगितले जात असे.

मिशन-यानी हिंदू धर्मावर जे चौफेर हल्ले चढविले त्यामुळे स्वसंरक्षणार्थ हिंदू धर्माभिमान्यांचीही एक फळी निर्माण झाली होती. त्यामध्ये विष्णुबुवा ब्रम्हचारी, मोरभट दांडेकर, कृष्णशास्त्री साठे असे अनेकजण होते. कृष्णशास्त्री चिपळूणकर हे स्वधर्मसंरक्षणासाठी `विचारलहरी` हे नियतकालिक चालवित असत. इ.स. १८५२ मध्ये मुंबईत ठाकूरद्वारात कृष्णशास्त्री साठे यांनी स्वधर्मतत्त्वांचे प्रतिपादन करणारी व्याख्याने दिली होती.

कोणीही धर्मांतर केले असता मिळकतीवरील त्याचे पूर्व हक्क बुडत नाहीत अशा आशयाचा कायदा इ.स.१८५० मध्ये सरकारने केला. धर्मांतरास

उत्तेजन व धर्मांतरित व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण यासाठीच हा कायदा करण्यात आला होता. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी या कायद्याची ` धर्मसंबंधी स्वातंत्र्याची मोठी सनद ` अशी भलावण केली. या कायद्याच्या परिणामांबद्दल त्या काळाच्या नियतकालिकातून उलटसुलट चर्चाही झाली.

पुण्यात ` कल्याणोन्नायक मंडळी ` नावाची एक संस्था स्थापन करण्यात आली होती.[१४] हिचे दोन उद्देश होते - १) सर्व धर्मांमध्ये व सर्व वादांमध्ये व सर्व व्यवहारांमध्ये मध्यस्तपणाने आपल्या बुध्दीला येईल तेच निश्चित करून लोकांस कळविले जाईल. २) सर्व शास्त्रांचे तात्पर्य एकच असता लोक भलतेच समजून दुराग्रहाने आपला तोटा करून घेतात. अशा विषयी वास्तविक तात्पर्य जाहीर केले जाईल. अशा उद्देशाने स्थापन झालेली ही संस्था म्हणजे धर्मविषयक जागृतीचे एक दृष्य फळ होते.

जातिभेद व मूर्ति पूजा मानू नये, विधवांच्या पुनर्विवाहास मान्यता असावी या तत्वांवर आधारलेली ` परमहंस मंडळी ` या नावाची चळवळ निर्माण झाली होती. हिच्या सभासदांनी काही प्रमाणात ख्रिस्तानुकरण केल्याने ती लोकक्षोभास बळी पडली असली तरी तिने धर्म व सामाजिक सुधारणांसंबंधी पुनर्विचारास चालना दिली.

महत्त्वाच्या व्यक्तींचे उल्लेख

` अरुणोदया ` त समकालातील अनेक महत्वपूर्ण व्यक्तींचे उल्लेख येतात. आत्मचरित्रकार हा आत्मचरित्रात आत्मचित्र पूर्ण करण्यासाठी इतरांविषयींचे आवश्यक तेवढेच उल्लेख करीत असतो. म्हणूनच सभोवताली वावरणाऱ्या व्यक्तींचे पूर्ण चित्र आत्मचरित्रकाराकडून अपेक्षिणे व्यर्थच असते. आत्मचरित्रात ` स्व ` तर विश्वाचे, त्यात वावरणाऱ्या व्यक्तींचे असे त्रोटक उल्लेख येणे

अपरिहार्य असते. `अरुणोदया` त हेच घडले आहे. बाबांनी त्याकाळातील महत्वाच्या व्यक्तींबाबत केलेले उल्लेख, प्रकट केलेल्या प्रतिक्रिया त्रोटक असल्या तरी त्या व्यक्तींच्या स्वभावावर, त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यास पुरेशा समर्थ व मार्मिक आहेत.

बाबा जेव्हा बेळगावच्या मिशन शाळेत शिकत होते तेव्हा शाळेच्या तपासणीसाठी बाळशास्त्री जांभेकर आल्याची हकीकत त्यांनी दिली आहे. बाळशास्त्र्यांची सुधारलेली मते लोकांच्या पचनी पडलेली नव्हती म्हणून त्यांचा कल ख्रिस्ती धर्माकडे आहे असा समज सर्वत्र रूढ झालेला होता. पालखीतून प्रवास करीत असताना ते गो-या साहेबाप्रमाणे पुस्तके वाचीत असत. तेव्हा ते बायबल वाचत असावेत असा तर्क लोक करीत. इंग्रजी शिकणे म्हणजेच ख्रिस्ती होणे ही समजूत लोकमानसात दृढमूल झाली होती.

एलफिन्स्टन स्कूलमध्ये प्रवेश घेतल्यानंतर बाबा प्रसिध्द नाटककार महादेवशास्त्री कोल्हटकर यांच्या सहवासात आले. त्यांची शिकविण्याची गोड शैली व भाषाप्रभुत्वाने त्यांना मोह घातला. प्रो.दादाभाई नौरोजी सारखा एतद्देशीय गृहस्थ इतके अस्खलित इंग्रजी बोलतो याचेही त्यांना आश्चर्य वाटले. बाबांनी धर्मांतर करू नये म्हणून वाद घालून त्यांची मते बदलण्याची जिद्द धरून आलेले मोरभट दांडेकर हे `अरुणोदया` त क्षणकाळ येतात. मोरभटांचा- `येशूने गाढव चोरले` हा आरोप बाबा खोडून काढतात तेव्हा ते प्रांजळपणे कबूल करतात की, `मला इंग्रजी येत नाही, माझे मित्र जे सांगतात ते मी ऐकतो` हा ही उल्लेख मोठा सूचक वाटतो.

बापू छत्रे, डॉ. आत्माराम पांडुरंग, डॉ. विल्सन, दादोबा पांडुरंग, डॉ. भाऊ दाजी, भाऊ महाजन यांच्याविषयीचे उल्लेख व प्रतिक्रिया `अरुणोदया`त आढळतात. आत्मचरित्रात `स्व` तर व्यक्तीचे पूर्ण चित्र शक्य नसते हा

दृष्टीकोण घेऊनच या उल्लेखांकडे पाहिले पाहिजे.

नियतकालिके :

त्या काळातील नियतकालिके ही मतपत्रे होती, वृत्तपत्रे नव्हती. त्यांचा वाचकवर्गही सर्वदूर पसरलेला व सर्वथरांतील नव्हता. सरकारी नोकर, विद्यार्थी व शाळाखात्याशी संबंधित असणारे लोक हेच त्यांचे वाचक असत. वृत्तपत्राची एखादी प्रत गावात येई, त्यामुळे त्याचे सार्वजनिक वाचन रूढ होते. `प्रभाकरा` सारखे नवमतवादी पत्र समाजाविषयी पुनर्विचार करू लागलेल्या तरुणांत प्रभावी होते. लोकहितवादींच्या सहीने प्रसिध्द होणाऱ्या लेखमालेमुळे माझा ब्राम्हणांवरील विश्वास उडाला ही बाबांची कबुली[१५] त्याचे द्योतक आहे.

`ज्ञानोदय` हे नियतकालिक ख्रिस्ती मिशनऱ्यांनी चालविले होते. बाबा ते मोठ्या आवडीने वाचीत, त्यात लेखनही करीत. ख्रिस्ती मिशनऱ्यांवर आक्रमक पवित्रा घेणारे `विचारलहरी` सारखे हिंदू धर्मरक्षक पत्र पुण्यातून निघत असे. यामधून टीका प्रतिटीका चाले. इंग्रजी राजवट व शिक्षणाच्या परिणामांतून निर्माण झालेली ही सामाजिक संस्था प्रबोधनाचे काम करीत होती.

ग्रंथनिर्मिती

नव्या ज्ञानाच्या व विचारप्रणालीच्या दर्शनाने भारावलेले नवशिक्षित इंग्रजीतील सर्व ज्ञान मराठीत आणण्याच्या खटपटीत होते. त्यामुळे या प्रबोधनकाळाचा ग्रंथनिर्मिती हा युगधर्म झाला होता. प्रारंभीच्या काळात शालेय पुस्तकांच्या निर्मितीप्रमाणेच सामाजिक उद्बोधनात्मक ग्रंथनिर्मितीलाही सरकारचे उत्तेजन होते. रजपूत लोकांतील कन्याहत्येच्या प्रथेसंबंधी डॉ.भाऊ दाजी यांनी लिहिलेल्या निबंधाला सरकारने बक्षिस दिले होते.[१६] ख्रिस्ती मिशनरी धर्मप्रसारासाठी पुस्तके लिहित होते व प्रसिध्दही करीत होते. त्याच्या खंडनासाठी

हिंदू धर्माभिमानीही या क्षेत्रात उतरत होते.

तरीही ग्रंथनिर्मितीचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व अजून सामान्यजनांना कळलेले नव्हते. धर्मग्रंथांच्या पावित्र्याविषयी बरेच गैरसमज रूढ असल्याने पवित्र ग्रंथांच्या छापिल प्रती हिंदू विकत घेत असत. `हरिविजया`ची हस्तलिखित प्रत १५ रूपयास मिळत असे. हाच छापिल ग्रंथ केवळ १ रूपयास उपलब्ध असे,तरीही तो कोणी विकत घेत नसत.

सरकारप्रमाणेच काही सार्वजनिक संस्थाही पुस्तके लिहिण्यास, ती प्रसिध्द करण्यास उत्तेजन देत असत.[१७]

१) दक्षिणी भाषेत पुस्तके प्रसिध्द करणारी मंडळी
२) दक्षिणा प्राईज कमिटी
३) मराठी ज्ञानप्रसारक मंडळी
४) ज्ञान प्रकाश सभा
५) अमेरिकन मिशन छापखाना.
६) बॉंबे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी

अशा कित्येक संस्था ग्रंथनिर्मितीला उत्तेजन देत, बक्षिसे देत, जाहीरात देऊन त्यानुसार पुस्तके लिहवून घेत. बाबांची काही पुस्तके अशाप्रकारे प्रसिध्द झाली होती. विचारप्रवण मन, लिहिण्याची हौस व जिद्द यामधून उमेदवारीच्या काळात लिहिणाऱ्यांना या संस्थांकडून चांगलेच सहाय्य होत असे.

`अरूणोदया`तील समाजदर्शनाची यथार्थता

धर्मांतरानंतर तेहेतीस वर्षांनी बाबा आपल्या धर्मस्वीकारासंबंधीची हकीकत `अरूणोदया`त मांडत आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून घडलेल्या समाज-

दर्शनाच्या यथार्थतेबद्दल शंका येणे स्वाभाविक आहे. ख्रिस्ती आचार-विचार हाडीमांसी घट्ट खिळल्यानंतर 'मी जे केले ते कसे योग्य होते' हे सांगणारे बाबा हिंदुधर्मावर छिद्रान्वेषीवृत्तीने तुटून पडत आहेत काय ? ख्रिस्ती धर्माची भलावण करण्याच्या नादात ते त्याचे उदात्तीकरण करतात की काय ? हे प्रश्न निर्माण होतात. त्यांची उत्तरे 'अरूणोदया' तील समाजदर्शनाच्या संदर्भात शोधणे आवश्यक आहे.

या काळात ख-या धर्माचा लोप झाला होता व अनैतिकता, अवडंबर व स्वार्थ यांचे प्राबल्य माजले होते. 'पुणे वर्णन,' 'रियासत-उत्तरखंड' 'ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती' इ. ग्रंथातून याला दुजोरा मिळतो. 'धर्माच्या शिकवणीकडे दुर्लक्ष होऊन यज्ञयाग, व्रते, उद्यापने इ. कर्मकांडातच मनुष्य इतका गुंतत चालला की त्याच्या मागोमाग शकुनमुहूर्त, नवस-गा-हाणी, अंगारे धुपारे, गंडेदोरे, देवदेवस्की, जारणमारण इ. गोष्टी सहजच येतात.'[१८] आणि असेच झाले होते. तत्कालीन समाज जीवनाचा अपरिहार्य भाग बनलेली ही धार्मिक, सांस्कृतिक विकृती बाबांनी 'अरूणोदया' त सविस्तरपणे मांडलेली आहे.

वाईट वर्तनासाठी धर्मशास्त्राचा आधार शोधण्याचा ढोंग्यांना लोकहितवादींनी चांगलेच खडसावले आहे.[१९] 'शास्त्रात आणखी बहुत सत्कर्मे लिहिली आहेत. ती सर्व तुम्ही करता काय ? आणि जर करीत नाही, तर मग भ्रष्टपणास मात्र शास्त्राचा आधार तुम्ही कशाकरिता धरिता ?' यावरून समाजातील सत्य, नीति, पावित्र्याचा -हास व ढोंगाचे प्राबल्य सूचित होते. या सर्वांचे अवलोकन करून असे म्हणावेसे वाटते की बाबांची धर्ममते एकांगी व एकांतिक असली तरी त्यांनी 'अरूणोदया' त घडविलेले समाजदर्शन यथार्थ आहे, ते असत्य नाही, ते अविकृत नाही.

# व्यक्तिचित्रण

## साहित्यातील व्यक्तिचित्रण

मनुष्याच्या जिज्ञासेचा अति आवडता विषय मनुष्यच होय. माणसाला इतरांची व्यक्तिमत्वे जाणून घेण्यात रस वाटण्याचे कारण इतकेच की, व्यक्तीच्या प्रत्येक कृतीमागे स्वभावाची ठेवण, विचारांची आंदोलने व भावनांच्या हालचाली असतात. आणि हे सर्व जाणून घेण्याची प्रत्येकाला उत्सुकता असते. माणसाच्या जिज्ञासेच्या आवडत्या विषयाचे - मानवी स्वभावाचे चित्रण साहित्यिक करीत असतो. कथाभागांतर्गत व्यक्ती आणि वाचक यांच्यामधून लेखक पूर्णत: अदृष्य होतो तेव्हाच खऱ्या रसनिर्मितीला आरंभ होतो. कादंबरीत भिन्न भिन्न चित्रे एकापुढे एक दाखवून, जरूर तेथे सांखळी जोडण्यापुरते त्याच्या येण्याने हे काम बव्हंशी साधते. नाटकात मात्र लेखकास प्रकट होण्यास अजिबात संधी नसते. पात्राचे मनोगत हे त्याच्या कृती व संवादाद्वारेच प्रकटते. नाटकात मनोविश्लेषण, दीर्घकालीन मनोविकास दाखविता येणे अशक्य असते. एकाग्रतेमुळे नाटकात उत्कटता येते खरी, पण मनोविश्लेषणाद्वारा ही उणीव कादंबरीत सहज भरुन काढता येते.

वाङ्‌मयप्रकार कोणताही असो पण त्यातील व्यक्तिचित्रणाबाबत लेखकाने पात्रांच्या अंतर्हृदयात प्रवेश मिळविला पाहिजे, त्याने पात्रांना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न करू नये, हे विधान महत्वाचे आहे. व्यक्तिचित्रण करताना लेखकाने पात्रांना स्वमतप्रकटीकरणाची साधने बनविल्यास त्यांच्यातील जिवंतपणा हरपून जाण्याची शक्यता असते. कारण पात्र म्हणजे सांगितलेल्या क्रिया करणारा कोणी अनामिक नव्हे, हे लेखकाने कधीही विसरता कामा नये.

प्रत्येक कलेला तिची अशी एक भाषा असते म्हणजे तिला तिचे असे एक आविष्काराचे साधन असते. हे ध्यानी घेतल्यास असे म्हणता येईल की, मनुष्य-स्वभाव ही वाङ्‌मयकलेची भाषा आहे.

आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रणाचे स्वरूप

इतर वाङ्.मयप्रकारातील व्यक्तिचित्रणापेक्षा आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रणाचे स्वरूप सवथैव भिन्न असते. इतर वाङ्.मयप्रकारासारखे लेखकाला येथे कल्पनेचे स्वातंत्र्य घेता येत नाही आणि स्वत:च्या व्यक्तिमत्वाचा लोपही साधता येत नाही. त्यामुळे आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रण तुलनात्मक दृष्टीने अधिक जिवंत व वास्तव असते. सत्यदर्शन व वास्तवघटिताची बंधने आत्मचरित्रकाराला पाळावी लागत असल्याने आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रणाचे रूप वेगळे बनते.

आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रण म्हणजे एका विशिष्ट स्वभावाच्या माध्यमातून घडलेले मानवी स्वभावदर्शन असते आणि अशा ह्या व्यक्तिचित्रणाच्या दोन मर्यादा आपल्या ध्यानी येतात. पहिली म्हणजे, आत्मचरित्रकाराला जाणवलेली व्यक्ती त्याला आढळलेल्या गुणदोषांसह तो प्रकट करीत असतो. प्रत्यक्षात ती तशी असेलच असे नाही. आत्मचरित्रकाराकडून येथे एकांगी चित्रणाची शक्यता नाकारता येत नाही. दुसरी मर्यादा म्हणजे, आत्मचरित्र-काराशिवाय इतर व्यक्तींचे चित्रण, वा दर्शन संपूर्ण असत नाही. त्या पात्राचे संपूर्ण व्यक्तिमत्व, त्याची मीमांसा यांना आत्मचरित्रात वाव नसतो. आत्मचरित्रकाराचा ज्या व्यक्तिशी जेवढा संबंध आलेला असतो, तेवढ्यापुरता तो त्या व्यक्तिचा उल्लेख करीत असतो आणि आत्मचरित्रात हे अपरिहार्य असते.

ह्या मर्यादा ध्यानी घेऊनही असे म्हणावेसे वाटते की, आत्मचरित्र-काराच्या-एकूण मानवी स्वभाव, त्यातील मनोव्यापारांच्या परिज्ञानावरच, त्याच्या व्यापक आकलनाचा आवाका ठरत असतो. त्यामुळे चांगले आत्मचरित्र म्हणजे आत्मचरित्रकाराच्या आत्मशोधन व आत्मविश्लेषणाइतकेच ' स्वे ' तर मनोदर्शन व विश्लेषणाचेही फलित असते.

मानवी स्वभावाद्वारे मानवी जीवनदर्शन घडत असल्यामुळेच `अरुणोदया` सह कोणत्याही आत्मचरित्राच्या अभ्यासात त्यातील व्यक्ति-चित्रणाच्या आकलनाला महत्त्व प्राप्त होणे अपरिहार्य असते.

आत्मचरित्र हे आत्मचित्रही असल्यामुळे येथे आत्मचरित्रकाराच्या स्वचित्राला महत्त्व येणे स्वाभाविक असते. स्वत:ला स्वत:पासून दूर ठेऊन स्वत:चे चित्रण करणे तसे अवघडच असते. स्वचित्रण एकांगी होऊ न देता ते इतरांना समतोल, नि:पक्षपाती व आस्वाद्य वाटावयास लावणे ही तारे-वरची कसरत आत्मचरित्रकाराला करावी लागते. आत्मचरित्रकार स्वत:चे व इतरांचे जे चित्रण करतो ते विशिष्ट व स्थलकालबध्द असले तरी आत्म-चरित्रकाराच्या कुवतीनुसार ते सर्वसामान्य होऊन विश्वात्मक पातळीवर जाऊ शकते आणि येथेच आत्मचरित्रास कलाकृतीचा दर्जा प्राप्त होतो.

`अरुणोदया`त बाबा पदमनजी हे `स्व` आणि `स्वे`तर व्यक्तिचित्रणात कितपत यशस्वी झाले आहेत त्याचा शोध उपरोक्त चर्चेच्या आधारे आता आपण घेऊ.

## बाबांचे `स्व` भावचित्र

आत्मचरित्र हे आत्मचित्र असल्यामुळे त्यात आत्मचरित्रकाराच्या स्वचित्रणाला महत्त्व येणे स्वाभाविक असते. यथार्थ स्वचित्रण करणे तसे सोपे नसल्यामुळे बऱ्याच वेळा आत्मचरित्र ही स्वत:संबंधाने आत्मसमाधानाने लिहिलेली कहाणी बनते. म्हणून स्वचित्र इतरांना समतोल व आस्वाद्य वाटावयास लावणे ही आत्मचरित्रकाराची एक कसरत असते. बाबा पदमनजी `अरुणोदया`त अशी कसरत करण्यात बरेचसे यशस्वी झाले आहेत.

भूतकाळ व त्यात जगणारा `मी`यावर विशिष्ट हेतूने आणि

दीर्घकालानंतर केलेले हे भाष्य आहे. स्वत:ला केंद्र करून बाबा जणू भूतकाळ जगतात, त्या काळात घडलेले घटना-प्रसंग, असलेल्या व्यक्ती याबाबतच्या प्रतिक्रिया ते प्रकट करतात.

बेळगावातील धार्मिक व सामाजिक वातावरणाचे सजीव चित्रण करून प्रारंभीच त्यांनी स्वत:बरोबर वाचकांना एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात नेले आहे. ब्राम्हणांना तूपपोळ्या व अस्पृष्यांना त्यांच्या उष्ट्या पत्रावळी मिळणे, देवपूजेसाठी का होईना पण विनापरवानगी फुले तोडणे, उपवास न करता उपवास केल्यासारखे दाखविण्याचे शिक्षण मिळणे या अनुभवांमुळे बाबा बालपणीच स्वधर्मातील ढोंग व विसंगती याबद्दल विचार करू लागतात. नीतीच्या ओढीतून ते भोवताली घडणाऱ्या घटनांचे समीक्षण करू लागतात. आजोबांची शक्तिपूजा व त्यांतील धर्माच्या नांवाखाली चालणारे वामाचार यांचा विचार त्यांच्या मनात घर करतो. तेंव्हा ब्राम्हणांचा मंत्राशिवादि व त्यांना योग्य दक्षिणा न दिल्यास मिळणारे शिव्याशाप, अस्पृश्यांच्या स्पर्शानंतर करावे लागणारे सचैल स्नान, ब्राम्हणेतरांना ` वेदोक्त फल प्राप्त्यर्थम ` म्हणावयाचा अधिकार नसणे, वर्गणीपटावर वर्गणीच्या रकमेचा आकडा मांडण्यातील संभावित तुबी इ. छोट्या मोठ्या अनुभवांमुळे त्यांचे बालमन घडत होते, उणीवा, विसंगती ध्यानी आल्यामुळे स्वधर्माविषयी अश्रध्द होत होते, कुचंबत होते. ह्या निरागस मनाचा २० धर्माच्या नावाखाली जणू कोंडमारा चालू होता. त्यामुळेच हा आपला धर्म नाही ही भावना त्यांच्या मनात बळावू लागली होती.

मराठी शाळेत विद्याभ्यास करीत असताना त्यातील ` लघुहितोपदेशा ` चा त्यांच्या मनावर जबरदस्त प्रभाव पडला. परमेश्वर दयाळू व सर्व पदार्थांचा दाता आहे, यास्तव जे लोक वाईट कर्म करतात त्यांस तो शिक्षा करील. या उपदेशाबद्दलचे त्यांचे आकर्षण, हे त्यांच्या मनाची धाव आध्यात्मिक व नैतिक दिशेकडे कशी होती हे दर्शविणारेआहे.

मूर्तिपूजा व तिचे इष्टानिष्टत्व याविषयी चिंतन करण्याइतके बाबांचे मन सक्षम झाले नव्हते. परंतु त्यासंबंधीची त्यांची अस्वस्थता सूचक आहे. शाळेत बक्षीस मिळालेल्या भुगोल खगोलाच्या पुस्तकातील, `हिंदू लोक अनेक देव व देवी यांच्या मूर्ती करून त्यांस भजतात ` हे वाक्य वाचून मला कसेसेच होत असे, ही बाबांची प्रतिक्रिया मनाच्या उपरोक्त अस्वस्थतेचीच दर्शक आहे. याच काळात बाबांच्या जीवनात घडलेला आणखी एक प्रसंग असाच लक्षणीय आहे. रिवस साहेबांच्या बहिणीने बाबांचे चित्र काढून, त्यात रंग भरून पाठविले तेव्हा त्याकडे पाहून रे. टेलर यांनी ` मूर्तिपूजकाची मूर्ती ` असे त्याविषयी उद्गार काढले होते. त्यावेळी बाबांना स्वत:ची मोठी लाज वाटली आणि ते ओशाळे झाले. हिंदु धर्मातील विसंगती जाणूवूनही त्यावर त्यांचा अजून विश्वास आहे. हिंदुधर्म विषायक निंदेचा राग येऊन ख्रिस्ती ट्रॅक्ट फाडून टाकणे व रे.टेलर यांच्या उद्गारानी ओशाळे होणे या परस्परविरोधी घटनांचा अर्थ म्हणजे त्यांच्या मनातील वैचारिक संभ्रम होय. मात्र हिंदू धर्माचारातील कार्कश्यातिकामुळे व आचार विचार यातील विसंगती जाणवल्यामुळे त्यांच्या मनात स्वधर्माबाबत तिरस्कार, दुरावा आणि नकाराची प्रतिक्रिया हळू हळू तयार होऊ लागली.

स्वत: रंगून जाऊन भूतकाळातील स्वचित्रण करणे व नंतर त्याबद्दल आजच्या परिपक्व ख्रिस्ती मनोभूमिकेतून भाष्य करणे हे त्यांच्या विचारप्रक्रियेचे वैशिष्ट्य जागोजागी जाणवते. बाबा भूतकाळात रंगून व बुडून जातात. परंतु जणू जाणिवपूर्वक भान ठेऊन आधी ठरवून घेतलेल्या ख्रिस्ती ईश्वरी पूर्वनियोजन कल्पनेच्या चाकोरीत फिरत राहातात असे वाटते. म्हणूनच भूतकाळ जगणारे बाबा आणि जागोजागी हेतुपूर्वक टिप्पणी करणारे बाबा यातील विसंवाद प्रकट होते. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे दुभंगलेपण ` स्मरणादिया ` तून जाणवत राहाते. इ.स. १८३९ मध्ये ते कुटुंबातील स्त्रींबरोबर मुंबईस गेले त्यावेळी प्रयाणाचा मुहूर्त काढला, प्रस्थान ठेवले, बरोबर पुष्कळ चाकर, गाड्या, बैल घोडी होती असे वर्णन त्यानी केले आहे पण त्यापाठोपाठच ` याकोबाच्या

खटल्याप्रमाणे बायका व लेकरेही होती, पण या[illegible]बाचा देव आमच्या संगती नव्हता, म्हणजे आम्ही त्याला ओळखत नव्हतो, व त्याच्या रक्षणाखाली आम्ही निघालो नव्हतो.[२१] असे त्यांचे जुन्या करारातील संदर्भाने युक्त असे भाष्य प्रकट होते. फ्रीचर्च विद्यालयातील प्रवेशाबाबतही `हे सर्व ईश्वरी सूत्रांकडून घडले` ही त्यांची प्रतिक्रिया ख्रिस्ती शास्त्रातील ईश्वरी पूर्व-नियोजन कल्पनेवरील श्रध्देची द्योतक वाटते. `स्मरणचित्रा`तून बाबांच्या व्यक्तिमत्त्वाच्या ह्या दोन बाजू अनेक ठिकाणी प्रकट होतात.

लग्नानंतर ते वडिलांसह एडनला जातात. तेथील मुक्कामात वडिलांच्या आग्रहामुळे रायटरची नोकरी पत्करतात. ही गोष्ट त्यांच्या मनाविरुध्द घडलेली असते. त्यामुळे साहेबापुढे गेल्यावर ते लटालट कापत व त्याना घाम फुटे. एखादी गोष्ट मनाविरुध्द घडली की बाबांचे मन असे अस्वास्थ होई.

दुसऱ्यावेळी एडनला जाणे रहित होणे व फ्रीचर्च शाळेत प्रवेश घेणे या घटना बाबांच्या जीवनात महत्वपूर्ण आहेत. बाबांचे वय यावेळी केवळ अठरा वर्षांचे होते. कुणाचे तरी आदर्श पाहाण्याचे व पटण्याचे हे वय असते. फ्रीचर्च शाळेतील एक शिक्षक रे.शेषाद्री `चर्चचा व धर्मसुधारणुकीचा इतिहास` शिकवित असत. त्यांच्या शांत व संयत व्यक्तिमत्वाचा व शिकविण्यातील तळमळीचा बाबांच्या मनावर विशेष परिणाम झाला. वर्गातील मुलांचे तपकिरीचे व्यसन एकदा रे.शेषाद्रींच्या ध्यानी येते म्हणून ते `तंबाखूपासून तोटे व हानी काय होतात ?` या विषयावर मुलांना मुद्दाम निबंध लिहावयास सांगतात. त्यावेळी बाबांना स्वत:ची व्यसनाधीनता आणि गुरूच्या उपदेशामागील तळमळ यातील विसंवाद स्पर्शून जातो व `आजपासून मी तपकीर ओढण्याचे सोडून दिले हाच माझा निबंध` असे उत्स्फूर्त उद्गार[२२] त्यांच्या तोंडून बाहेर पडतात. सुधारणानुकूल वातावरणात स्वत:ची नैतिक प्रगती कशी होत गेली याचे प्रभावी चित्रच त्यांनी रेखाटले आहे.

बाबा आणि त्यांचे समविचारी मित्रमंडळ केवळ धर्मजिज्ञासेने पछाडलेले होते. त्यांना हिंदू धर्मात नीति, मानवता, सेवाभाव या सद्गुणांचा अभाव जाणवला. या सद्गुणांची उपस्थिती ख्रिस्ती धर्मात आहे हे त्यांच्या ध्यानी आले. म्हणूनच ही मुले दर रविवारी प्रार्थनेसाठी किंवा चर्चेसाठी एकत्र येत. तेथे प्रामुख्याने बायबल वाचले जाई. बाबाही यात भाग घेत. एकीकडे बायबलवर श्रध्दा व दुसरीकडे हिंदू धर्मातील श्रेष्ठ देवतांची उपासना, त्यातील क्षुद्र दैवतांची भक्ती-मनामधील ही ईश्वर श्रध्दाविषयक वादळे त्यांनी प्रकटविली आहेत.

सगुणोपासनेच्याद्वारे माणूस निर्गुणोपासनेपर्यन्त पोहोचतो हे हिंदू धर्माचे तत्वज्ञान बाबांना आता व्यर्थ वाटू लागले. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्या हाती बुध्दिवादाचे शस्त्र आले. त्यामुळेच त्यांच्या मनात ही वैचारिक जागृती होऊ लागली आहे. निर्गुण, निराकार अनंताला दगडात कोंडून ठेवण्यातील विसंगती त्यांना जाणवू लागली आहे. परमात्म्यापर्यन्त पोहोचण्याचे हिंदु धर्मोक्त मार्ग त्यांना सत्य, नीतिशी विसंगत वाटू लागले आहेत.

नीतीच्या शोधात असणारे बाबा २५ ऑगस्ट १८४९ रोजी कांही मजकूर एका चिठ्ठीवर लिहून ठेवतात. त्यांमधून त्यांची सदाचरणाची उत्कटेच्छा प्रकट होते. ख्रिस्ती शास्त्रातील शुध्द नीति शिकू लागल्यानंतरच अशी प्रतिज्ञा त्यांना करावीशी वाटली.[२३]

ख्रिस्ती नसतानाही बाबा बायबल मास्तर झाले. हे आपल्या आवडीचे काम ते मनापासून करीत. कारण बायबल म्हणजे त्यांच्या जिव्हाळ्याचे व श्रध्देचे स्थान होते. बायबलमधील `अहो कष्टी तुम्ही सर्व मजकडे या `या वचनाचा अर्थ स्पष्ट करताना ते सद्गदित होत. बायबलमधील विचारप्रणाली व स्वत:च्या अंत:प्रवृत्ती यांत कांही अनामिक नाते असल्याचे यावेळी त्यांना जाणवत असे.

उघडपणे जातिभेद मोडण्याचे धैर्य स्वत:मध्ये नव्हते हे त्यांनी कबूल केले आहे.[२४] जातिभेद मोडण्याप्रमाणे मूर्तिपूजेबाबतही त्यांचे मत दोलायमान होते. यासंबंधात ते म्हणतात की, ' तरी माझी हिंदु धर्मावरील श्रध्दा तिळमात्र कमी झाली नाही, उलट विशेष वाढत जाऊन मूर्तिपूजेच्या अगदी हलकट प्रकाराकडे वळली'.[२५] परमहंस मंडळीच्या बोभाट्यानंतर ऊडता-यास येताना घडलेला एक प्रसंग बाबांनी सांगितलेला आहे. प्रवासात एके ठिकाणी रस्त्याच्या बाजूस एक देऊळ लागले, त्यात शेंदराने माखलेले दोन दगड होते, ते मी रस्त्यावर आणून ठेविले असे ते सांगतात. बाबा येथे भावनातिरेकातून कृतिप्रवण होतात. बाबा अजूनपर्यन्त कोणत्याही निर्णयाप्रत आले नसल्यामुळे ही कृतिप्रणवता त्यांच्या विचार-प्रक्रियेचा अपरिहार्य भाग आहे असे मात्र जाणवत नाही.

स्वत:चे आस्तिक्य जपण्यासाठी म्हणून बाबा ' परमहंस मंडळी ' त्याग करतात. बाबांची याविषयी प्रतिक्रिया अशी,[२६] ' वास्तविक पाहता ह्या मंडळीच्या मतांपासून आत्म्याच्या तृष्णा तृप्त होण्याजोगे तीत कांहीच नव्हते, केवळ जुन्या मतांस कंटाळलेल्या लोकांस क्षणभर टेकण्याची मात्र ती जागा होती. पापाची क्षमा कशी होईल, तारणारा कोण, शांति देणारा कोण इ.अत्यंत महत्वाच्या गोष्टींचा परमहंस मंडळीचे लोक मुळीच विचार करीत नसत.' आणि अशाप्रकारे बाबांना ख्रिस्ती भूमिकेतून आत्मिक समाधान देण्यास ही संस्था कुचकामी वाटली.

बाबांच्या वडिलांनी त्यांचे मन धर्मांतराच्या निश्चयापासून वळविण्याचे अनेक प्रयत्न केले. अन्य नातेवाईकांनीही मसलती दिल्या. या स्वींतून पार होण्याचा त्यांनी प्रयत्न केला. धर्मांतरानंतर स्वसमाजाकडून जो छळ, अडचणी, विरोध होतो तो सहन करण्याची बाबांच्या मनाची अजून तयारी झाली नव्हती.[२७] कांही वेळा घरच्या मंडळीवरील प्रेमामुळेही त्यांचा निश्चय डळमळीत होत असे आणि मनात परस्पर विरोधी भावनांचे वादळ सुरू होत असे. दूर गावी जाऊन

बाप्तिस्मा घ्यावा, विलायतेस जावे की विष खावे, मिशन-यास बोलावून परमेश्वरावरील विश्वास पत्करावा. असे अनेक विकल्प त्यांच्या मनात येत. शेवटी ३ सप्टेंबर १८५४ मध्ये ते बाप्तिस्मा घेऊन प्रकटपणे ख्रिस्ती झाले.

ख्रिस्ती मताचा सखोल अभ्यास व त्याचा प्रसार हेच आता त्यांचे जीवित ध्येय होते. मानसिक कोलाहलानंतर धर्मांतराच्या निर्णयाप्रत आपण कसे आलो याचे सुंदर वर्णन त्यांनी मुंबईला गेल्यानंतर वडिलांना पाठविलेल्या पत्रात केले आहे.[२८] `आज तीन वर्षांपासून मी हा विचार करीत होतो, पण मला किती अडचणी दिसून येत. माझ्या मनाचा अविश्वास, लज्जा, लोकांचे भय, निंदेचे भय, छळणुकीचे भय, पैशाचा लोभ, स्वस्थपणाने व निष्काळजीने खाण्यापिण्यास मिळते त्या सुखाची आवड, आपणास दु:ख देऊ नये, आपणास मजकरिता लोकांत हसतील ही भीति, अशी अनेक कारणे व अनेक अडचणी माझ्या डोळ्यांपुढे नित्य उभ्या असत. तर मी निश्चयपूर्वक व सत्य सत्य आपणास सांगतो, की देवाकडून मला विश्वास, धैर्य, शक्ति मिळाल्याशिवाय माझ्याने हे काम करविले नाही.`

बाबांच्या अंतर्मुख वृत्तीमुळे त्यांना जी आत्मविश्लेषणाची देणगी लाभली आहे, त्यामुळे त्यांचे स्वचित्र अधिकच प्रभावी झाले आहे. लोकभय, स्वास्थ्याचा मोह, वडिलांची प्रतिष्ठा, कुटुंबियांचे प्रेम इ. कारणांमुळे ते प्रकट ख्रिस्ती होण्यास घाबरत होते. हे त्यांनी केलेले `स्व` मनोविश्लेषण त्यांच्या प्रांजळपणाचेही द्योतक आहे.

या आत्मचरित्रात त्यांच्या धर्मपरिवर्तनापर्यन्तची कहाणी आली आहे. यामधून त्यांनी अविष्कृत केलेले `स्व` `भाव` चित्र पुरेसे ठळक आहे. त्यांच्या प्रांजळपणामुळे ते समतोल आणि आस्वाद्यही वाटते. कळायला लागल्यापासून `धर्म` ह्या अतिमानवी शक्तीने कबजा घेतलेले बाबांचे व्यक्तिमत्त्व केवळ धर्म आणि-वेतच जीवानार्थ शोधण्याचा प्रयत्न करीत होते हे ध्यानी घेतल्याशिवाय त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एकांगी विकासाचे व `अरुणोदया`त उमटलेल्या त्याच्या

अविष्काराचे आकलन होणार नाही.

## बाबांचे वडील - पदमनजी माणिकजी

'अरूणोदय' हे सर्वांगीण जीवनचित्रण नाही. बाबा आपल्या धर्मांतराची कहाणी विशिष्ट दृष्टीकोनातून सांगत आहेत. ह्या मतसंक्रमणाशी त्यांच्या वडिलांचा म्हणजे पदमनजींचा निकटचा संबंध आल्यामुळे 'अरूणोदया' तील त्यांचे चित्रण महत्वपूर्ण ठरते. कोणताही आत्मचरित्रकार स्वचित्र रंगवत असताना इतरांचेही चित्रण करीत असतो. हे 'स्व' तर मानसचित्रण आत्म-चरित्रकाराच्या व्यक्तिमत्वावर पुन्हा उलटा प्रकाश टाकीत असते. पदमनजींच्या व्यक्तिचित्रणाबद्दलही असेच विधान करता येणे शक्य आहे.

पदमनजी हे टी.बी. जर्विस यांच्या इंजिनिअरिंग स्कुलात शिक्षण घेतलेले, इंजिनियरांच्या पहिल्या वहिल्या पिढीचे प्रतिनिधी आहेत. हुषारी व कर्तबगारीमुळे त्यांना नोकरीत बढती मिळत जाते, पगार वाढतो, कुटुंबातील राहणीमान खर्चिक व डामडौलाचे होत जाते - पण नोकरीत गुंतलेले पदमनजी मुलांबाळांपासून शरीराने व विशेषत: मनाने दूर जातात. मुलांकडे आपले व्यवस्थित लक्ष पोहोचत नाही या भावनेतून बाबांसाठी ते खासगी शिकवण्यांची व्यवस्था करतात.

पदमनजी कठोर धर्माचरणी नसले तरी ते स्वधर्माबद्दल श्रध्दाळू आहेत. गीतेचा एखादा अध्याय ते रोज वाचीत असत, तिची पूजा करीत व झोपतेवेळी ती पोथी उशाजवळ ठेवीत. पारंपारिक वळण घरात रूढ असले तरी वर्तमान कालानुकूल सुधारणांचे वारेही तेथे वाहात होते. पदमनजींचे धाकटे बंधू, नारायण यांचे शिक्षण बेळगावच्या मिशन स्कुलात झाले होते. बाबानांही तेथेच धाडले जाते. पदमनजी सरकारी नोकरीत असल्यामुळे गो-या अधिका-यांशी त्यांचा जवळून

संबंध येई. धर्मविचारातील प्रागतिकता त्यांच्यात आली नसली तरी सहिष्णुता व उदारमतवादाकडे ते झुकले होते. मुळात संयमी, प्रेमळ स्वभाव होता तो अधिकच सहिष्णु झाला होता. बाबांना लग्नाचेवेळी ते वधूच्या पसंतीबद्दल विचारतात हे त्यांचे वर्तन काळाच्या तुलनेत समंजस स्वभावाचे द्योतक वाटते.

'परमहंस मंडळी' च्या बोभाट्यानंतर पदमनजी बाबांना 'तुझी आई आजारी आहे' असा निरोप पाठवून मुंबईहून बोलावून घेतात. फ्रीचर्च शाळेचे वातावरण व ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या सहवासामुळे आपला मुलगा बिघडला आहे, असे त्यांना वाटत असते. मुलाशी धर्मसंबंधी वाद करण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रसंग असतो. नवे संस्कार व नवे शिक्षण याकडे कुतूहलाने पाहणाऱ्या त्यांच्या मनाला आपल्या मुलाने धर्मांतर करून समाजात निंदेचा, कुचेष्टेचा विषय होऊ नये असे वाटत असते. त्याने चार चौघांसारखे वागावे व पाद्र्यांच्या नादाने घरापासून, समाजापासून तुटून निघू नये ही त्यांची अपेक्षा आहे. पदमनजी समजूतदार असले तरी मुलाने ख्रिस्ती व्हावे हे त्यांना पटणारे नाही. निदान स्वत:च्या ह्यातीत तरी त्याने ख्रिस्ती होऊ नये एवढी माफक अपेक्षा ठेवून बाबांना ते मुंबईस जाण्याची परवानगी देतात. पुत्रवर्तनाबद्दलचा त्यांचा विरोध बोथट होण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांचे पुत्रप्रेमच होय. बाबांची नवधर्म स्वीकाराबद्दलची उत्कट तळमळ त्यांना जाणवते, यामुळेही ते स्वमताला काहीशी मुरड घालतात. बाबांसाठी घरातील मूर्ती फेकून देण्यासही ते तयार होतात. बाबांनी कोणतीही धर्मकृत्ये न करण्यासही अनुमती देतात. घराची प्रतिष्ठा अबाधित राहावी म्हणून बाबांनी बाहेरून तरी जनरीतीप्रमाणे चालावे ही त्यांची अपेक्षा असते. पण बाबांच्या स्वभावाला ही तडजोड मानवण्यासारखी नसते. यामुळे पदमनजी आणखीच केविलवाणे होतात. मुलगा आपल्या पासून तुटू नये आणि समाजातील प्रतिष्ठाही अबाधित राहावी या दोन्ही गोष्टी साधण्यासाठी चाललेली पदमनजींची धडपड मनाला भिडते. बाबांनी वडिलांच्या या मानसिक अवस्थेचे चित्रण परिणामकारकपणे केले आहे.

फ्रीचर्च विद्यालयाच्या ख्रिस्ताळले-या वातावरणातून बाबांना बाहेर काढल्यास ते सुधारतील या अपेक्षेने पदमनजी बाबांना मेडिकल कॉलेजात दाखल करतात. याच काळात बाबांची काही पुस्तके प्रसिध्द होतात तेव्हा त्यांच्या-बद्दलचा पदमनजींच्या मनातील अभिमान दुणावतो.

इ.स.१८५४ मध्ये पदमनजींची बदली साता-याहून बेळगावास होते. त्यावेळी रजा घेऊन ते मुंबईस येतात. पदमनजींच्या जवळ त्यांचे नातेवाईक बाबां-विषयी बराच गिल्ला करतात, त्यांना सैल सोडल्याबद्दल दूषणे देतात. पुत्र-प्रेमाखातर त्यांनी ममताळा घातलेली मुरड नातेवाईकांना समजू शकत नाही. मुलाच्या धर्मांतराबद्दल त्यांना सख्त नाराजी असली तरी त्याच्या मतपरिवर्तना-साठी पदमनजींनी वापरलेले मार्ग सामंजस्याचे आहेत. बाबांच्या प्रामाणिक धर्म-जिज्ञासेवर अन्याय, बळजबरी होऊ नये असे त्यांना वाटे. पदमनजींच्या या दृष्टी-कोणाची त्यांच्या नातेवाईकांना कल्पना असल्यामुळेच `आम्ही पैसे देतो, बंगल्यात राहून मजा कर पण ख्रिस्ती होऊ नकोस` ही मसलत ते पदमनजींच्या देखत देऊ धजत नाहीत.[२९]

इ.स. १८५४ च्या होळीच्या सणादिवशी बाबा रंग खेळण्यास नकार देतात तेव्हा पदमनजी समजावतात की, `आपण चारचौघांसारखे वागले पाहिजे, नाहीतर समाजात आपली नाचक्की होईल. आम्ही तुला वाढविले त्या आम्हांस सोडावे असा तुझा देव सांगतो की काय ?` यावेळी बाबांच्या अढळ निश्चयाची कल्पना आल्यामुळे ते म्हणून लागतात, `तुझा धर्म आम्हा सगळ्यांना शिकव आपण सगळेच ख्रिस्ती होऊ मग आपणास कोणी नावे ठेवणार नाही` हे त्यांचे म्हणणे वरपांगी होती की मनापासूनचे होते हे बाबांनाही उमजत नाही.[३०]

बाबांच्या धर्मांतरामुळे पदमनजींच्या घरावर टीकेचा वर्षाव होऊ लागतो. बाबांबद्दलही बरेच भलेबुरे बोलले जाते तेव्हा, `आमच्या या नातलगाने काही चोरी

लबाडी करून आमची अब्रू तर गमावली नाही. त्याच्या मनाला जो धर्म आवडला तो त्याने पत्करला. या सूज्ञ विचाराने त्यांनी इतरांच्या आक्षेपांना उत्तर दिले. मुलाशी संबंध तोडा असे अनेकांनी त्यांना सुचवून पाहिले पण त्यांच्या मनाला ते रुचले नाही.

बाबांच्या आध्यात्मिक संघर्षाच्या काळातील पदमनजींची भूमिका महत्वपूर्ण आहे. इतकेच नव्हे तर धर्मांतराकडे झालेला बाबांचा प्रवास तसा सहजतेने व फारसा संघर्ष न करता झाला याचे श्रेय पदमनजींच्या समंजस स्वभावाला व वर्तनाला दिले पाहिजे. बाबांनीही ही गोष्ट मान्य केली आहे.[३१] `ते ख्रिस्ती मतापासून दूर होते तरी माझ्याबद्दलची त्यांची वर्तणूक सूज्ञपणाची होती. त्यांना दुष्ट मसलती देणारे अनेक असले तरी ते स्वत:च्या विचाराने चालले. माझ्यावर त्यांचे खूप प्रेम होते ---- त्यांच्या इच्छेविरुध्द (मी) ख्रिस्ती झालो तरी त्यांनी दुजाभाव ठेविला नाही. ख्रिस्ती होण्याने कुळाला कालिमा लागेल असे त्यांना वाटे पण त्यांचा माझ्यावरील प्रेम व भरवसा कधीही कमी झाला नाही. आपल्या पित्याच्या स्वभावाबद्दल बाबांनी मोजक्याच शब्दात केलेले हे भाष्य बरेच कांही सांगून जाते.

## बाबांची आई

बाबांनी रेखाटलेले आईचे चित्र फारसे ठळक नाही. त्यांनी जागोजागी केलेल्या उल्लेखातून ते जुळवून घ्यावे लागते. पुष्कळ व्रतवैकल्ये आचरणारी एक श्रध्दाळू स्त्री ही तिची प्रतिमा प्रथमत: आपणासमोर उभी राहाते. माहेरहून आणलेल्या दैवतांचीही ती पूजा करी, ब्राम्हणांना दाने देई, शिवरात्रीस शिवाल्यात लक्ष वाती जाळे - त्या जळेपर्यन्त बाबाही तिजसोबत असत.[३२] बाबांच्या धर्मसंस्कारांच्या घडणीत, त्यांच्या श्रध्द वृत्तीच्या जोपासनेत, त्यांच्या आईच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव कारणीभूत आहे. त्यांच्या संस्कारक्षम वयातील

सश्राध्द व आस्तिक्यपूर्ण मनोघडण भावी जीवनातील वैचारिक वादळातही पक्की राहिली. बाबा ख्रिस्ती झाले पण अश्रध्द व नास्तिक झाले नाहीत, ते या बालवयातील संस्कारांमुळेच.

'परमहंस मंडळी' च्या बोभाट्यानंतर बाबांच्या वडीलांनी त्यांना ऊडत-यास बोलावून घेतले. बाबा घरी आल्यानंतर आई खूप रडते. बाबा सुखरूप आहेत म्हणून मनावरून उतरलेला भार व ते ख्रिस्ती मताकडे झुकू लागल्याबद्दल लागलेली काळजी - यामधून प्रकट होते. बेळगावाहून आल्यानंतर बाबा नोकरी करण्यास ठाम नकार देतात आणि कुटुंबियांना धर्मशिक्षण देण्याचा इरादा प्रकट करतात त्यावेळी त्यांच्या आईस जे वाटते त्याचे वर्णन त्यांनी नेमकेपणाने केले आहे.[33] 'माझ्या आईने फारच दु:ख केले, तिला वाटले की, त्या दिवशी मी ख्रिस्ती झालो' बाबा धर्मांतर करणार नाही या वेड्या आशेला तिचे मन आजवर चिकटून होते पण आता मात्र ती आशा पार दुरावली असे जाणवते.

सुनेच्या ऋतुदर्शनाच्यावेळी धार्मिक कार्यक्रमासंबंधीची त्यांच्या आईची वागणूक काहीशी हट्टी वाटते. दारापुढे वाद्ये वाजवून बाबांना नाराज करू नये असे पदमनजींचे पत्र येते. मुलाला न दुखावता, चुचकारून, मार्गी आणण्याचा त्यांचा उद्देश तिच्या ध्यानी येत नाही. एकांतात ती बाबांचे पाय धरते, पदर पसरते व डोळ्यांत अश्रू आणून, 'एवढा प्रसंग साजरा केलाच पाहिजे, नाहीतर आपल्या नावलौकिकास बट्टा लागेल' अशी विनवणी करते. मुलाची द्वंद्वात्मक मन:स्थिती, त्याच्या मनात चाललेला संघर्ष हे सारे ध्यानी घेण्याइतके आकलन तिच्याजवळ नसावे हे स्वाभाविकच आहे.

घरी न कळविता बाबा जेव्हा रे. टेलर यांच्या घरी जातात तेव्हा ती दिराच्या मदतीने मुलाचा शोध घेते, स्त्रीसह बाबांना भेटावयास जाते. अनेक प्रकारे समजूत घालते, विनवण्या करते. खरे पाहाता बाबांचा निश्चय

ढळविणारा हा प्रसंग, पण ते अचल राहातात. हर उपाय करून थकलेली ही दुर्दैवी स्त्री अखेरीस त्राग्याने बाबा, रे. टेलर यांना शिव्याशाप देत निघून जाते. हा तिचा त्रागाही बाबांवरील निरतिशय प्रेमच सुचवून जातो.

हा प्रसंग घडण्याच्या चौथ्या दिवशी बाबांना कळते की, आई आपल्यासाठी उपवास करून शरीर क्षिणवते आहे. तेव्हा `माझ्यासाठी उपवास करू नकोस` असे ते कळवितात. त्यावेळी ती निरोप पाठविते. 'मजकरिता दु:खी होऊ नकोस जिथे आहेस तेथे सुखी ऐस, मी आता उपास करीत नाही' आपला मुलगा ख्रिस्ती झाल्यामुळेच दुरावला, या वस्तुस्थितीमुळे अंतरी व्याकुळ झालेल्या, तरीही त्याचे हितचिंतन करणाऱ्या आईचे अतिशय हृदयस्पर्शी चित्र बाबानी रेखाटले आहे.

बाप्तिस्म्यानंतर बाबा मुंबईला जाण्याचा निर्णय घेतात त्यावेळी आईचे म्हणणे `जे झाले ते झाले, आता फक्त डोळ्यांपुढे ऐस` बेळगावात राहा, मुंबईस जाऊ नकोस असे असते. आईची व्याकुळता व बाबांची तत्वनिष्ठा यामधील हा संघर्ष दोन दृष्टीकोणांचा आहे, तो दोन व्यक्तींमधील नाही. तो संघर्ष अटळ असल्यामुळेच **वाचकांच्या** मनाला सरळ भिडतो.

बाबांनी आईचे केलेले चित्रण सलग नाही, सविस्तर नाही. तरीही एकसंस्कारी आहे. तसेच त्यांच्या मनावरील आईचा प्रभाव दर्शविण्याइतके सुस्पष्ट आहे.

बाबांची पत्नी

बाबांचे लग्न इ.स.१८४८ मध्ये मोठया डामडौलात झाले. त्यावेळी त्यांचे वय सतरा वर्षांचे तर त्यांच्या पत्नीचे वय केवळ दहा वर्षांचे होते. त्यावेळी तिला लिहिता वाचताही येत नव्हते. तत्कालीन रिवाजाप्रमाणे या

अजाण मुलीने नशिब तिला न विचारताच बाबांशी जखडले गेले.

बाबांचे धर्मपरिवर्तन व त्यामागील त्यांची भूमिका समजण्याइतकी आकलन-क्षमता तिच्या ठिकाणी अपेक्षिणे व्यर्थच आहे. म्हणूनच जेव्हा बाबा घरातील लोकांना धर्मशिक्षण देण्याचा इरादा प्रकट करतात तेव्हा ती इतरांप्रमाणे रडते व घडणारे मूकपणे पाहाते.

बाप्तिस्म्याच्या आधी बाबा पित्याच्या आज्ञेनुसार घरी येतात. तेव्हा त्यांना वेगळ्या खोलीत जेवण वाढले जाते. वस्त्रांतर न करता जेवणाऱ्या पतीकडे पाहून ती म्हणते, ' अशा कपडयांतसुध्दा जेवण गोड लागत असेल, ' बाबांच्या धर्मांतराबद्दल व त्याच्या एकूण गंभीर परिणामांबद्दल विचार करू न शकणारी ही एक निरागस स्त्री आहे हे येथे जाणवते.

धर्मांतरानंतर तिने आपल्याबरोबर राहावे यासाठी बाबा तिचे मन वळवितात. बाबांनी सक्ती न करतासुध्दा ती जातिभेद मोडते, म्हणजे बाबांना शिवून पाणी पिते. परंतु बाबांचे सासरे येतात व साराच मामला फिसकटतो. ती वडिलांबरोबर मुंबईस निघून जाते. ' मुंबईस तुमच्याकडे येईन ' असे मात्र सांगून जाते. तिच्या मनातील या कोंडमाऱ्याकडे सहानुभूतीने पाहाण्याची गरज आहे.

बाबा हायकोर्टात समन्स काढतात तेव्हा ती जज्जापुढे नकाचा पाढा लावते. घटस्फोट होतो. यानंतर साधारण चार वर्षानंतरचा प्रसंग बाबांनी सांगितलेला आहे. एका ख्रिस्ती मुलीशी आता त्यांनी पुनर्विवाह केला आहे. अशा अवस्थेत ती बाबांना भेटते. त्यांच्याकडे येण्याची इच्छा प्रकट करते. बाबा तिची इच्छा मान्य करू शकत नाहीत. ती कष्टी होऊन निघून जाते. दोघांमधील संबंध पूर्णपणे संपतो. एका स्त्रीची आणि तिच्या भावनांची ही दारूण शोकांतिका हृदयाला चटका लावते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

इतर पात्रांचे जे चित्रण आत्मचरित्रकार करतो ते अपूर्ण असते. हे जरी खरे असले तरी बाबांनी आपल्या पत्नीविषयक वर्णनात अनुत्साह दाखविला आहे असे वाटते. तिच्या नावाचाही साधा उल्लेख त्यांनी `स्मरणादिवा` त एकदाही केलेला नाही `माझी स्त्री, माझी बायको` असेच उल्लेख आलेले आहेत. जणू तिला त्यांच्याशिवाय स्वत:चे असे अस्तित्वच नव्हते.[३४]

या चित्रणात बाबांनी पत्नीच्या दृष्टिकोणाचा विचार केलेला नाही. तसेच तिच्याबद्दलच्या प्रतिक्रिया ते स्पष्टपणे मांडत नाहीत म्हणूनच त्यांनी रेखाटलेले तिचे चित्र पूर्ण वाटत नाही. आत्मचरित्रकाराला जाणवलेली व्यक्ती त्याला जाणवलेल्या गुणदोषांसह प्रकट होते, हे व्यक्तिचित्रण प्रत्यक्षातील व्यक्तीचे यथार्थ दर्शन असेलच असे नाही. ही जाणीव येथे ठेवणे गरजेचे आहे.

## बाबांचे चुलते - नारायण माणिकजी

बाबांचे हे धाकटे चुलते. यांचे शिक्षण बेळगावच्या लंडन मिशनच्या शाळेत पूर्ण झाले होते. इ.स. १८५२ च्या सुमारास हे वेगळे राहू लागले तरी भावाच्या घराशी यांचे संबंध जिव्हाळ्याचेच राहिले. नारायण यांच्या संग्रही एक बायबल होते याचा अर्थ मात्र ते ख्रिस्ती धर्माकडे ओढ घेणारे होते असे नव्हे.

ख्रिस्ती मताच्या दिशेने बाबांचा प्रवास सुरू असताना त्यापासून त्यांना मागे फिरविण्याचे प्रयत्न अनेकांकडून सुरू होते. नारायण यांनीही याच हेतूने १३ फेब्रुवारी १८५४ ला बाबांना एक पत्र लिहिले. त्यात मुख्यत: तीन गोष्टींवर भर होता-

> ख्रिस्ती होण्यात मोठे पाप आहे. कारण तेणेकरून आईबापांच्या आज्ञेचा भंग होतो व त्यांस दु:ख होते.

ख्रिस्ती झाल्याने आपली अब्रू, मान, कुल यांना बट्टा लागतो व चहूकडे फजिती होते.

ख्रिस्ती झालेल्या एतद्देशीय लोकांची दुर्दशा होते, त्यांना अन्न मिळेनासे होऊन ते पश्चाताप पावतात व त्यांस घरची आठवण होते.

धर्मांतराच्या निर्णयापासून बाबांनी मागे परतावे म्हणून नारायण यांनी हा तर्कवाद लढविला आहे. त्यांनी आपले वडील भाऊ, पद्मनजी यांनाही १२ मार्च १८५४ ला एक पत्र पाठविले आहे. त्याचा सारांश असा, बाबाला फ्रीचर्च स्कूल व त्याच्या मित्रमंडळीपासून दूर ठेवावे. तुम्ही त्याचे फार लाड केलेत. तुम्हीच त्याचे आज्ञेत आहात. त्याला घरचे काम सांगावे, प्रपंचसुखात गुंतवावे, या पत्राचा अभिप्राय त्याच्या कानी पडेल असे करावे - मुलाला नको तितक्या सामंजस्याने वागविण्याची मोठ्या भावाची मवाळवृत्ती त्यांना टीकास्पद वाटते. म्हणून प्रसंगी चार शब्द सुनविण्यासही ते कमी करीत नाहीत.

ख्रिस्ती धर्माकडे ओढ घेणारे व नंतर बाप्तिस्मा घेणारे बाबा, त्यांना निर्णयापासून परत फिरविण्यात अपयशी बनलेल्या नारायण यांच्या रोषाला बळी पडले. परंतु कालांतराने नारायण यांचा राग शांत झाला. बाबा पुण्यास राहू लागले तेव्हा नारायण तेथेच होते. त्यांनी बाबांकडे येणे-जाणे सुरू केले.

१९ जून १८६४ या दिवशी नारायण यांनी बाबांना सहकुटुंब आमंत्रित केले व मेवामिठाई, पानसुपारी देऊन कटुंबवत्सल झाल्याबद्दल आनंद प्रदर्शित केला. लोकनिंदेकडे दुर्लक्ष करून धर्मांतरित पुतण्याला त्यांनी जगजाहीरपणे स्वीकारले. नारायण यांचा बाबांविषयीचा राग हा त्यांच्याबद्दलच्या आत्यंतिक प्रेमातूनच जन्मला होता.

रे. नारायण शेषाद्री

एडनहून आल्यानंतर बाबांनी फ्रीचर्च शाळेत प्रवेश घेतला. त्या शाळेत

रे. शेषाद्री हे शिक्षक होते. ते बाटलेले ब्राम्हण असल्यामुळे बाबांचे त्यांच्याविषयीचे प्रारंभीचे मत कलुषित झाले होते. म्हणून रे.शेषाद्री ज्या वर्गास शिकवित तेथे बसावे असे त्यांना वाटले नाही. रे.शेषाद्री यांनी मात्र आपल्या संयमी व समंजस स्वभावानुसार, `तो या वर्गास योग्य असेल तर त्यांस बसू द्यावे` असे म्हणून बसू दिले. बाबांनी रे.शेषाद्रींचे प्रथमदर्शनीच रूप जाणवले ते असे, त्यांचा सर्व पोषाख, पागोटे, अंगरखा, धोतर, उपरणे हे सर्वच शुभ्र असे. इंग्रजी चालीप्रमाणे राखलेले केस व पायमोजे असत. त्यांचे इंग्रजी बोलणे शुध्द, स्पष्ट व सावकाशीचे असे.[३५]

रे.शेषाद्री वर्गातील मुलांना फार आस्थेने व परिश्रमाने शिकवित. गरीब मुलांना पुस्तके, कपडे देत. मुलेही त्यांजवर खूष असत. `बाटलेले` म्हणून त्यांच्याबद्दलचा बाबांचा गैरसमज आता हळूहळू निवळू लागला. बाबा त्यांच्याशी वाद घालत. रे.शेषाद्री हिंदू धर्माबद्दल जी मते मांडत ती मात्र बाबांना पटत नसत.

रे.शेषाद्री हे केवळ अभ्यासक्रम शिकविणारे शिक्षक नव्हते. त्यांनी मुलांच्या अपराधांची चौकशी करण्याकरिता एक कोर्ट स्थापिले होते. त्यांच्या उत्तेजनामुळे मुलांनी एक परोपकारी मंडळी चालविली होती. त्यायोगे गरीब व गरजू मुलांना मदत केली जाई. सहाध्यायांच्या संगतीने बाबांना एकदा तपकिरीचे व्यसन जडले असताना रे.शेषाद्रींनी बाबांकडून व्यसनमुक्तीची शपथ घेवविली. बाबांच्या सुधारणुकीचा प्रारंभ येथपासून झाला. विद्यार्थ्यांच्या नैतिक उन्नतीसाठी दक्ष असलेला एक शिक्षक, अशी त्यांची प्रतिमा आपणापुढे उभी राहाते.

बाबा हळूहळू रे. शेषाद्रींच्या जवळ येऊ लागले. शाळेत जाता-येताना बाबा त्यांच्या समवेत असत. त्यांनी चालविलेल्या खाजगी वर्गालाही ते हजर असत. बाबा कॉलेज डिविजन मध्ये गेले तेव्हा रे.शेषाद्री यांना चर्चचा इतिहास शिकवू लागले. त्यांनी शिकविलेल्या ल्यूथरच्या चरित्राचा, त्याच्या तत्वप्रिय निर्भयतेचा

बाबांच्या संवेदनक्षम मनावर चांगलाच प्रभाव पडला. रे.शेषाद्रींच्या अध्यापनातील विद्वत्तेबरोबरच त्यांची आत्मीयता, संयम व ममतेमुळे बाबा बदलत चालले.

बाबा आपल्या वडिलांसह जेव्हा बेळगावी निघाले त्यावेळी रे. शेषाद्रींनी त्यांना एकांतात नेले व त्यांचेकरिता ईश्वरापाशी फार आग्रहाच्या प्रार्थना केल्या. आत्मिक उन्नतीच्या शोधात असलेल्या बाबांना रे.शेषाद्री यांचे हे वर्तन मोलाचे वाटते.

बाप्तिस्म्यानंतर जेव्हा बाबा मुंबईस येतात तेव्हा प्रथम काही महिने ते रे. शेषाद्रींच्या घरीच राहातात. दोघांचा संबंध पूर्वी गुरू-शिष्यांचा असतो तो आता धर्मबंधूंचा होतो. या सहवासामुळे बाबांना बराच लाभ होतो. ते म्हणतात,[38] `त्यांनी व त्यांची पत्नी यांनी माझा सुखदु:खात घरच्याप्रमाणे सांभाळ केला. कोणत्याही गोष्टीचे मला उणे पडू दिले नाही. इथे मला दैहिक अन्नाखेरीज उत्तम आत्मिक अन्न व ख्रिस्ती वर्तनाचा किता मिळू लागला.'

ज्या नीतिमान, सेवाभावी, प्रेमळ मिशनऱ्यांच्या सहवासामुळे बाबा ख्रिस्ती धर्माकडे आकर्षित झाले त्यात रे.शेषाद्रींचा समावेश होतो. म्हणूनच बाबांच्या आत्मिक उन्नतीच्या प्रवासातील एक मार्गदर्शक व प्रेरक म्हणून रे.नारायण शेषाद्री यांचे स्थान वैशिष्टयपूर्ण व महत्वाचे आहे.

`अरुणोदया`तील व्यक्तिचित्रणाचे मूल्यमापन

आपल्या मनात धर्म परिवर्तन कसे साकारत गेले, याची माहिती सांगण्याकरिता बाबा पदमनजी यांनी प्रस्तुत आत्मचरित्र लिहिले आहे. एका अर्थी त्याचे स्वरूप कैफियती सारखे आहे. त्यामुळे बाबांचे सर्वांगिण जीवनचित्रण येथे उपलब्ध होते असे म्हणवत नाही. या वस्तुस्थितीचा विचार केल्यास `अरुणोदया`तील `स्व` आणि `स्वे`तर व्यक्तिचित्रणाचे स्वरूप आणि

मर्यादाही ध्यानी येतात.

ख्रिस्ती धर्मांतरापर्यंत पोहोचण्याइतका, बाबांचा मनोविकास कसा झाला. अगदी बाबांच्याच शब्दात सांगावयाचे झाले तर, `देवाने आपल्या सूत्रांकडून व प्रभू येशूच्या कृपेने मला अंधारातून आपल्या आश्चर्यकारक प्रकाशात कसे आणले` याचे वर्णन करण्याच्या प्रेरणेतून बाबा स्वचरित्र लिहित आहेत, स्वचित्र रेखाटत आहेत. स्वजीवनात आपातत: घडलेल्या घटना प्रसंगामुळे मनोघडण कशी झाली, हे सांगण्याचा त्यांचा इरादा नाही. धर्मांतराच्या लक्ष्याला पोषक व पूरक अशा घटनांची निवड करून त्यांनी स्वचित्र रेखाटले आहे. अशी निवड करीत असताना, `मजविषयी आजपर्यन्त ज्या ज्या गोष्टी घडून आल्या, त्याविषयी जर आरंभापासून विचार केला तर त्या सर्वांत देवाचा हात आहे व ती देवाची करणी होती असे आपणास दिसून येईल ----- `अशाप्रकारे ईश्वरी नियोजन कल्पनेची ( Divine Dispension ) श्रध्दावृत्तीही त्यांनी धारण केली आहे. त्यामुळे बाबांचे स्वाभाविक आत्मचित्र बदलून गेले आहे. एडनला दुसऱ्यांदा जाणे रद्द होणे, फ्रीचर्च विद्यालयातील प्रवेश, सद्वर्तनाबद्दलची शपथ, रे. टेलर यांच्या घरी मुक्कामास जाणे या घटनांकडेही ते याच विशिष्ट दृष्टीतून पाहात आहेत. तेहेतिस वर्षांच्या ख्रिस्ती जिण्याचा अनुभव घेतलेले बाबा भूतकाळात जगणाऱ्या `हिंदू बाबां`चे यथोचित चित्रण करू शकत नाहीत. बाबा स्वविषयक संपूर्ण सत्य येथे सांगू शकले नसले तरी सत्याचे विकृतीकरण व सत्यापलाप या गोष्टी त्यांनी केल्या नाहीत. म्हणूनच धर्मप्रचारासाठी लिहिलेल्या या आत्मचरित्रातील बाबांचा `स्व` प्रचारकी वाटत नाही. आपले स्वचित्र इतरांना आस्वाद्य व समतोल वाटावयास लावण्यात ते बरेचसे यशस्वी झाले आहेत.

स्वत:शिवाय इतरांचे जे चित्रण बाबांनी केले आहे त्यात वडिलांचे चित्रण सविस्तर आहे. मुलाविषयी अतीव ममता व अभिमान असलेले परंतु

लोकापवादाला बावरल्यामुळे, कधी मी सर्वांसह आत्महत्या करेन अशी धमकी देणारे तर कधी आम्हा सर्वांना ख्रिस्ती धर्म शिकव, आपण सर्वजण ख्रिस्ती होऊ मग आपणास कोणी नावे ठेवणार नाही असे म्हणणारे आपले वडील, त्यांच्या मनातील वादळांसह मूर्तिमंत उभे करण्यात बाबा यशस्वी झाले आहेत. बाबांनी आपली आई, चुलते, रे. शेषाद्री यांचे चित्रण असेच उत्कटतेने केले आहे. या व्यक्तींचे चित्रण संपूर्ण नाही असे कोणी म्हणेल, परंतु हे ध्यानी घेतले पाहिजे की आत्मचरित्रातील ' सर्व ' तर व्यक्तिचित्रण त्रयस्थाच्यादृष्टीने नेहमी अपुरेच असते. बाबांनी आपल्या पत्नीच्या चित्रणात मात्र अनुत्साह दाखविला आहे. संपूर्ण आत्मचरित्रात ते तिचे नावही उच्चारीत नाहीत. तिचे नाव मथीबाई असावे, असे इतर साधनावरून [37]वाटते. आवश्यक तेथे केलेल्या त्रोटक उल्लेखावरून तिचे चित्र जुळवून घ्यावे लागते. पत्नीचे असे त्रोटक उल्लेख करतानाही ते अधिक तटस्थ व कोरडे होतात असे जाणवत राहाते. इतर व्यक्तींविषयी ते उत्कटपणे लिहितात पण पत्नीबद्दल लिहिताना असा उत्कटपणा उरत नाही.

' एका विशिष्ट मानवी स्वभावाच्या माध्यमातून घडलेले त्याचे व इतरांचे दर्शन ' या दृष्टिकोणातून ' अरुणोदया ' तील व्यक्तिचित्रणाकडे पाहिल्यास आणि ' अरुणोदया ' च्या लेखनप्रेरणांचे वास्तविक भान ठेवण्यास - त्यातील व्यक्तिचित्रणाचे योग्य मूल्यमापन करता येणे शक्य आहे.

## वादग्रस्त प्रसंग : एक शोध

आत्मचरित्राचे लेखन म्हणजे एका व्यक्तीच्या दृष्टिकोणाचे फलित असते. त्यामुळे आत्मचरित्रकाराने कितीही आत्मनिरपेक्ष चिंतन करावयाचे म्हटले तरी त्याला आपला चष्मा दूर ठेवून वास्तवताकडे पाहाता येणे अशक्य होऊन बसते. यामुळेच त्याच्या व त्याने वर्णिलेल्या वस्तुस्थितीबद्दल वाद उद्‌भवणे शक्य

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

असते. बाबा पदमनजी यांच्या ' अरुणोदय ' या आत्मचरित्रात असे कोणते वादग्रस्त प्रसंग आहेत ? त्यासंबंधी वाद का निर्माण झाले ? त्याकडे पाहाण्याची बाबांची व इतरांची भूमिका कोणती आहे ? या प्रश्नांचा विचार करून त्यामधील सत्याचा शोध घेणे गरजेचे आहे.

## (अ) बाबांनी ' परमहंसमंडळी ' सोडणे

बाबा परमहंसमंडळीतून का बाहेर पडले, यामधील सत्यासत्यता पडताळून पाहाण्याआधी या संस्थेचे स्वरूप व या संस्थेशी बाबांचा कसा व कोठवर संबंध आला याची चर्चा करणे अर्थपूर्ण ठरेल.

### ' परमहंस मंडळी '

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पाश्चात्य संस्कृती व तिला अंगभूत असलेला ख्रिस्ती धर्म यांच्या संसर्गामुळे नवशिक्षितांच्या पहिल्या पिढीत जे वैचारिक आवर्त उदभवले त्याचे पर्यवसान एका बाजूने परमहंस मंडळीच्या स्थापनेत व दुसऱ्या बाजूने तिच्या कांही सदस्यांच्या धर्मांतरात झाले. रा.ब. दादोबा पांडुरंग यांनी पुढाकार घेऊन ही संस्था स्थापन केली. तिचा उल्लेख 'परमहंससभा' असाही केला जातो. बंधुभाव व समता या तत्वांच्या पायावर तिची उभारणी झाली होती. हिंदु धर्मावर सर्व बाजूनी हल्ले चालले असताना तरूण पिढीला परधर्मात जाण्यापासून किंवा नास्तिक मतापासून दूर राखावयाचे असेल तर समाजापुढे हिंदू धर्माचे उपनिषद्‌कालीन शुध्द रूप ठेवणे आवश्यक आहे, ही गोष्ट दादोबांच्या नजरेला आल्यानेच त्यांनी या सभेच्या निर्मितीत पुढाकार घेतला. या सभेच्या आचार विचारांवर मात्र ख्रिस्ती धर्माची छाप होती. धर्मांतराशिवाय बाकीचे सारे तंत्र त्यांनी ख्रिस्ती मिशनऱ्यांपासून उचलले होते. यामध्ये अनुकरण

असले तरी, तावत्कालापर्यन्त रूढ असलेल्या धर्मात बदल करण्याची विचारशक्तीही त्यात स्पष्ट दिसते. धर्माच्या बाबतीत कोणतीही ढवळाढवळ करूनये तशी करताच येत नाही. अशी भावना सर्वत्र रूढ असताना ख्रिस्तानुकरणाने का होईना पण धर्मस्वरूपात बदल करण्याची आपली तयारी आहे हे दर्शविल्यामुळे या संस्थेचे प्रयत्न प्रगतिपर ठरतात.[३८]

बाबा परमहंस मंडळीचे सदस्य झाले
---------------------------------

बाबांचे काही मित्र या संस्थेचे सभासद होते व गुप्तपणाने दुसऱ्यांस दीक्षा आणणारे होते. धर्मजिज्ञासू बाबांचा परमहंस मंडळीशी या मित्रांमार्फत संबंध आला. जातिभेद, मूर्तिपूजेला विरोध व विधवांच्या पुनर्विवाहाविषयी मान्यता ही सभेची मुख्य मते असल्याचे बाबा सांगतात. मंडळीचे नियम वाचून दाखविल्यानंतर एकाच प्याल्यातील दूध सर्वांना प्यायला लावत. अशा प्रवेशक विधीनंतर बाबांचे नाव पटावर नोंदविले गेले. मंडळीच्या सदस्यांची संख्या पुरेशी वाढेपर्यन्त तिचे अस्तित्व गुप्त ठेवावे असे धोरण होते. पण एका गृहस्थाने सदस्यांची नावे जाहीर केली आणि असे पसरविले की, हे सर्वजण ख्रिस्ती होणार असून अमुक दिवशी त्यांचा बाप्तिस्मा होणार आहे यामुळे सर्वत्र खळबळ उडाली.

सभेचे गुप्तपणाने चालणारे कामकाज, या कार्यपध्दतीतच तिच्या विनाशाची बीजे होती.[३९] सभासदांची यादी फुटल्यामुळे सभा मोडली हे मात्र खरे नाही. ही सभा कालांतराने दुसऱ्या संस्थेत परावर्तित झाली तरी तिची तत्वे नष्ट झाली नाहीत. ज्या धार्मिक आणि सामाजिक सुधारणेच्या उन्नत तत्वांचा तिने गुप्तरीतीने का होईना पुरस्कार आणि प्रसार केला त्या तत्वांचा काही पराभव झाला नाही. बोभाट्यानंतर मंडळी पार मोडली असे बाबाही म्हणत नाहीत.

## बाबांनी वाचलेला निबंध आणि मतभेद

बाबांनी म्हटल्याप्रमाणे सभेच्या बैठका गुप्तरीतीने भरत असत. अशाच एका बैठकीत १० डिसेंबर १८५२ या दिवशी `उध्दवाने गोपीस शिकविलेले ब्रम्हज्ञान` या विषयावर बाबांनी निबंध वाचला. काही सदस्यांनी नास्तिक मत स्वीकारून या निबंधावर टीका केली. आणि मतभेद होऊन बाबा परमहंस मंडळीतून बाहेर पडले.[40]

प्रस्तुत निबंधाचा सारांशाने आशय असा.

> जोपर्यन्त तो (कृष्ण)गोकुळात होता तोपर्यन्त त्याने तेथील स्त्रियांस आपल्याशी रूजू करून ठेविल्या होत्या. त्यांशी विषयलंपट होऊन आपला कामातुरपणा पुरविला पण त्यांस तारणोपायाचा मार्ग सांगितला नाही.
>
> उध्दवाने गोपींच्या मनातील सगुण मूर्ति काढण्याचा प्रयत्न न करिता त्यांस असे सांगितले की ज्याचे तुम्ही अहोरात्र चिंतन करिता तो ( कृष्ण ) व तुम्ही एकच आहात. तोच तुमच्या हृदयी भरला आहे व सर्वतोच आहे.
>
> आमचा सखा आम्हास टाकून गेला तो केव्हा भेटेल हेच त्यांस वेड लागले होते, ते दूर होण्याकरिता उध्दवाने त्यांस सांगितले की, बायांनो तुमचा कृष्ण तुम्हांजवळच आहे. तुम्हीच कृष्णरूप आहां, व्यर्थ शोक का करिता ? या बोधाने त्यांचे तारण कसे झाले असेल ? व त्यांस कोणत्या अमरत्वाची आशा प्राप्त झाली असेल ती असो.

येथे बाबांनी कृष्णाबद्दल काढलेले उद्गार त्यांच्या ख्रिस्ती चष्म्याचे द्योतक आहेत. ईश्वराची संकल्पना ज्यांच्या मनात तयार झाली नाही अशांसाठी मूर्तिपूजा आहे, हे बाबा विसरतात. आत्मा परमात्म्याचे अद्वैत म्हणजेच मोक्ष ही संकल्पनाही बाबा विसरलेले दिसतात. बाबांनी या निबंधात मांडलेले विचार एकांगी व पूर्वग्रहदूषित आहेत. सभेच्या सदस्यांना हे विचार समतोल वाटले नाहीत म्हणून त्यांनी बाबांना विरोध केला. हा विरोध न कळल्यामुळेच बाबा त्यांना नास्तिक म्हणत आहेत. अन्यथा हिंदू विचारांकडे ख्रिस्ती चष्म्यातून पाहाणे हेच `आस्तिक्य` मानावे लागेल. मुळात स्वधर्माविषयी अश्रध्द झालेले व परमहंससभेचा ख्रिस्ती धर्मस्वीकारासाठी काहीही उपयोग होत नाही हे ध्यानी आल्यामुळे केवळ बाबाच नव्हे तर कासमभाई ढाल्वाणी, शाहू दाजी कुकडे, नारायण रघुनाथ इ. सभेचे अनेक सदस्य तिच्यातून बाहेर पडले.

परमहंस मंडळीची मते नास्तिक होती असे बाबा सांगतात पण `ईश्वर एक आहे व तोच पूज्य आहे. नीतिपूर्वक सप्रेम ईश्वरभक्ती हाच धर्म` हे तिचे स्थापनातत्व होते.[४१] ही गोष्ट बाबा विसरलेले दिसतात. खरे पहाता परमहंस मंडळीत प्रवेश करण्याआधीच बाबांचा ख्रिस्ती धर्मस्वीकाराचा निर्णय झालेला होता. ही संस्था आपल्या निर्णयाला मूर्तरूप देण्यास उपयोगी पडेल म्हणून ते तिकडे वळले होते. परंतु आपल्या निर्णयाच्या पूर्ततेसाठी ही संस्था उपयोगी पडणार नाही ही खात्री झाल्यानेच बाबा या सभेपासून दूर गेले, हीच यातील वस्तुस्थिती आहे.

## (ब) बाबांचे धर्मांतर

बाबांचे धर्मांतर म्हणजे त्यावेळी आलेल्या धर्मांतराच्या लाटेचे प्रतीक आहे की त्यामागे काही वैचारिक निष्ठा, प्रामाणिकपणा आहे, याचा शोध घेणे आवश्यक आहे. त्यांच्या धर्मांतरानंतर त्यावर अनेकांनी अनेक प्रकारे भाष्य

केले. यासर्वांमधून सत्यांश शोधण्यासाठी धर्मांतरामागील बाबांची भूमिका व त्याबद्दलची इतरांची मते ध्यानी घेणे गरजेचे आहे.

इंग्रजानी रूळविलेल्या शिक्षणपध्दतीद्वारा जे संस्कार केले जात, त्यातून शिक्षण घेणारे स्वधर्माविषयी अश्रध्द होत. बाबा त्यापैकीच एक होते.

बाबांची भूमिका
-------------

बाबांच्या मनाची धर्मविषयक वैचारिक जडण घडण निश्चित झाली होती. त्यामुळे त्यांना परमहंस मंडळीची विचारसरणी रूचली नाही. फक्त प्रकटपणे बाप्तिस्मा घेण्याबद्दल यावेळी त्यांच्या मनात संभ्रम होता, तोही कालांतराने दूर झाला, आणि त्यांनी ३ सप्टेंबर १८५४ रोजी बाप्तिस्मा घेतला. त्याआधी `धूमकेतू` स पाठविलेल्या पत्रातून त्यांनी धर्मांतरामागील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्याचा सारांश असा -

> माझी पूर्वी हिंदू धर्मावर मोठी निष्ठा होती पण कांही दिवसांनी भूतबाधा, मंत्र, जादू, मुहूर्त, शकुन इ. गोष्टींवरील माझा विश्वास उडाला. ऋग्वेदातही ईश्वराच्या गुणांच्या विरूध्द गोष्टी आहेत असे कळले. नित्य ख्रिस्ती शास्त्राचा अभ्यास केला, तेव्हाच टॉमस पेन, गिबन, ह्यूम ह्यांची ख्रिस्ती मतखंडनपर पुस्तकेही वाचली व शेवटी ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेविषयी खातरी झाली.
>
> विचारेकरून पाहिले असता ज्याविषयी आपली खातरी झाली आहे, जे आचरण केले असता आपल्या पुष्कळ बोलण्यापेक्षा व लिहिण्यापेक्षा लोकांच्या मनावर विशेष ठसा उठतो व त्यांचा विचार जागृत होतो ते आपण केले पाहिजेच, हे एक आपले कर्तव्यच होय असे जाणावे ----
>
> मनात ख्रिस्ती धर्मश्रध्दा प्रबळ पण उघडपणे बाप्तिस्मा घेण्यास अनेक

अडचणी असा २ - २½ वर्षांचा काळ गेला. अशा स्थितीत राहून मरण प्राप्त झाले असता ईश्वराच्या न्यायासनापुढे उभे राहताना आपली रदबदली करणारा त्यावेळी आपणास नाकारील या शास्त्र-लेखाचे भय वारंवार वाटू लागले. शेवटी परमेश्वरानेच कृपा करून जो धर्म मी गुप्तात आचरित होतो, तो प्रसिध्दपणे आचरण्यास शक्ती व धैर्य दिले यात मी विशेष कांही केले नाही, जे माझे कर्तव्य होते तेच केले.

इतरांच्या प्रतिक्रिया
---------------

बाबांचा हा खुलासा प्रसिध्द झाल्यानंतर `ज्ञानप्रकाश` मधून प्रसिध्द झालेली टिप्पणी [४२] पुढीलप्रमाणे होती, `घुमकेतूत बाबा पदमनजीचे स्वदस्तूरचे लांबलचक पत्रात ख्रिस्ती धर्म राजीखुशीने व अक्कलहुशारीने कसा स्वीकारला हे वृत्त आहे. सर्व मनुष्यास आपापल्यापरी शहाणपणाचा ताठा असतोच, आणि हा क्रम दीर्घकाळापासून चालत आला आहे, तेव्हा बाबा पदमनजीने लिहिले त्याचा मोठा हर्ष मानावा असे नाही.` बाबांसारख्या एका हिंदूने ख्रिस्ती धर्म स्वीकारावा व त्याचे जाहीर समर्थन करावे हे वर्तन आगाऊपणाचे वाटल्याने `ज्ञानप्रकाश` ने बाबांवर टीकेचा मारा केला आहे.

बाबांना ख्रिस्ती धर्माची भुरळ पडली ती शाक्त पंथातील भोळसट व विकृत आचार पाहूनच. पण हिंदु धर्मातील उज्वल तत्वे त्यावर परिस्थितीमुळे आलेली काजळी, ती दूरकरण्याचे उपाय यावर त्यांनी कांहीच विचार केलेला दिसत नाही. हिंदू धर्माचे विकृत बाह्याचार पाहून बाबांनी धर्मांतराचा घेतलेला निर्णय `वर्तमानदीपिके` ला [४३] अविवेकीपणाचा वाटतो, `स्वधर्माचे तत्व बाबास प्राकृत पुराणे वाचून कितपत कळले आहे, हे उघडच आहे. तर आम्हास असे वाटते की हिंदू धर्माच्या बाह्यत: दिसणाऱ्या गोष्टी पाहून त्या त्यांस खोट्या दिसल्या व त्यामुळे त्याने स्वधर्म सोडला, परंतु ही गोष्ट चांगली झाली नाही.`

`ज्ञानप्रकाश ` व `वर्तमानदीपिके` मधील टीकेत वृत्तपत्रीय भडकपणा असेल परंतु बाबांचा धर्मांतराचा निर्णय त्यांच्या क्रांतिक विचारपध्दतीमधून व मनाच्या अपक्वतेतून जन्मले आहे, हे प्रस्तुत टीकेमधील सार स्वीकारार्ह वाटते.

निर्णय प्रामाणिक, पण मनाची अपक्वता

अव्वल इंग्रजी आमदानीत जी शिक्षणपध्दती रूढ होती, तिच्यात असे कांही सामर्थ्य होते की त्या चाकोरीतून जाणारा एक तर स्वधर्मासंबंधी चिकित्सा करीत परिणामी तो बराचसा अश्रध्द तरी होई अथवा सरळ ख्रिस्ती धर्माचे पोवाडे गाऊ लागे. `बाबांसारख्या भाविक प्रवृत्तीच्या तरुणांना स्वधर्मातील अभाव नेमके तेवढे निवडून दाखवल्याने त्यांच्या मनाने, हे अभाव ज्यात नाहीत अथवा त्यांच्या पूर्तीचा ज्याच्यामुळे अधिक संभव होता अशा ख्रिस्ती धर्माकडे झुकावे हे स्वाभाविक होते.`[४८]

पौर्वात्य आणि पाश्चात्य संस्कृतींचा तुलनात्मक विचार करून त्यातील ग्राह्यांश स्वीकारण्याइतका विवेक तत्कालीन नवशिक्षितांत नव्हता. नव्या-जुन्याची सांधेजोड करताना ते खूपच गोंधळून गेले होते. पंचविशीतील तरुण बाबाही याला अपवाद नव्हते. सत्य व नीति यांचा शोध त्यांच्या आयुष्यात ब-याच आधीपासून सुरू होता. सद्वर्तनाबद्दल घेतलेली शपथ हीत्याचीच साक्ष आहे. स्वधर्मातील आचार-विचारातील विसंगती, स्वःस्थितीत लोपलेल्या त्याच्या मूल्यत्वाबद्दलचे अज्ञान आणि मिशन-यांचा सहवास यांच्या परिपाकातून त्यांचे धर्मांतर झाले पण ते स्वार्थी हेतूतून घडले नव्हते. मानवी जीवनातील अत्युच्च आत्मिक सुखाचा शोध घेताना जो मार्ग पटला तो त्यांनी अवलंबिला. ख्रिस्ती धर्मातील मानवता, सद्वर्तन, सेवाभाव, नीतिमयता या मूल्यांच्या दर्शनाने भारावून जाणे, ती मूल्ये आपल्या समाज-जीवनाच्या प्रवाहात आणून सोडण्याचा प्रयत्न करणे वेगळे आणि ती मूल्ये ध्यानी आल्यानंतर स्वधर्माचा त्याग करून परधर्माला कवटाळणे हे वेगळे आहे. यातील अंतर बाबांना कळले नाही. कळले असते तर त्यांनी स्वधर्म त्यागा ऐवजी ख्रिस्ती धर्म-

तत्वांच्या सहाय्याने स्वधर्म उध्दाराचा मार्ग पत्करला असता. हे ध्यानी आल्यामुळेच धनंजय कीर म्हणतात,[४५] `बाबा पदमनजींचे धर्मांतर म्हणजे ख्रिस्ती धर्माच्या वृक्षावर विराजमान होऊ इच्छिणाऱ्या एका तत्वचिंतक मनाचा पराभव होय.`

धर्मांतरातून आत्मिक कल्याणाचा मार्ग शोधण्यामध्ये बाबांची अदूरदृष्टी प्रकट झाली असेल पण त्यात मनाशी राखलेली प्रामाणिकता निश्चित आहे. निर्णयासाठी मानसिक अस्वस्थतेच्या अनेक रात्री घालविल्यानंतर स्वत:च्या सद्सद्विवेक बुध्दीला स्मरून त्यांनी आत्मशांतीसाठी, पापविमोचनासाठी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. स्वधर्म सुधारणेच्या कल्पनांनी बाबांच्या मनाची पकड घेतली नाही, विज्ञानविकासाने समृध्द झालेल्या ऐहिक जीवनाचे त्यांना आकर्षण वाटले नाही. अगदी कळायला लागल्यापासून `धर्म` या शक्तीने त्यांना झपाटून टाकले व अनेक धर्ममतांचा अभ्यास व चिंतन करीत त्यांची धर्मजिज्ञासा अखेर ख्रिस्ती धर्ममतांमुळे समाधान पावली. यामधून घडलेले धर्मांतर त्यांच्या अपक्व, एकांगी, अतिरेकी मनोभूमिकेचे फलित असले तरी त्यामागील बाबांची प्रांजलता, तळमळ ही सच्चीआहे, उत्कट आहे.

### (क) बाबांच्या घटस्फोटाचा खर्च आणि `यमुना पर्यटन` पासूनचे उत्पन्न.

बाप्तिस्म्यानंतर बाबांची पत्नी त्यांचेपासून वेगळे होऊन आपल्या बापाकडे राहू लागली. तिच्या परत येण्याची बरीच वाट पाहिल्यानंतर बाबांनी हायकोर्टात समन्स काढले. हे प्रकरण शेवटी घटस्फोटापर्यन्त गेले. या घटस्फोटाच्या खटल्याचा खर्च त्यांनी `यमुनापर्यटन` ही कादंबरी लिहून भागविला असा समज बरेच दिवस रूढ आहे. त्यातील सत्य कोणते आहे, याची चर्चा आता आपण करू.

द.वा.पोतदार आणि इतर

उपरोक्त समज द.वा.पोतदारांच्या एका विधानामुळे पसरला आहे. तेमूळ विधान [४६] असे, `या बायकोच्या वादापायी रु.२०० बाबांस खर्च आला तो यमुनापर्यटन लिहून भागवला.`

द.वा.पोतदारांची ही भूमिका पुढेही अनेकांनी तशीच स्वीकारलेली आहे. वि.ह.कुलकर्णी म्हणतात,[४७] `बाबा ख्रिस्ती झाले तेव्हा आपल्या बायकोनेही ख्रिस्ती झाले पाहिजे. या मुद्यावर नवराबायकोचे भांडण हायकोर्टात गेले व शेवटी बायको हिंदूच राहिली.ह्या खटल्यापायी बाबांना जो शे-दोनशे रुपये खर्च आला तो त्यांनी `यमुना पर्यटण` ही कादंबरी लिहून भागवला.`

ल.म. भिंगारे यांनीही हीच री ओढली आहे.[४८] `बाबा पदमनजी हे इ.स. १८५४ साली ख्रिस्ती झाले होते पण त्यांची बायको त्यांजकडे येण्यास तयार नव्हती. या निमित्ताने खटला उद्भवला. त्याच्या खर्चाची तरतूद करण्यासाठी बाबांनी प्रस्तुत कादंबरी लिहिली.`

द.वा. पोतदारांच्या भूमिकेचे अनुकरण करणाऱ्या इतर मान्यवरांच्या भूमिका अवलोकिल्या नंतर यामधून काही गैरसमज उद्भवतात ते असे -

> आपल्या बायकोला ख्रिस्ती कळपात ओढण्यासाठीच बाबांनी खटला चालविला होता.
>
> खटल्याचा खर्च भागविण्यासाठीच ते कादंबरी लिहावयास बसले होते.
>
> मराठीतील ही पहिली आणि सामाजिक दृष्टीने महत्वाची असलेली कादंबरी, पैशाच्या उपलब्धतेसाठी, एका साहित्यबाह्य हेतूमधून जन्माला आली आहे.

सत्यशोधन

ह्या गैरसमजांच्या जंगलातून वाट काढून सत्याचे शोधन करण्यासाठी 'अरुणोदया' तील पुढील मजकूराकडे आपणास लक्ष दिले पाहिजे.

वरील टीकाटिप्पणी होण्या आधीच बाबांनी जे सांगितले आहे ते असे [४९] - 'ही गोष्ट १८५७ साली घडली व या खटल्यास मला सुमारे २०० रु. खर्च आला. हे पैसे यमुनापर्यटन पुस्तकात मिळाले होते. त्याअर्थी त्याचा नफा, नवरा जिवंत असून जी वैधव्यात पडली होती तिला त्या अवस्थेतून सोडवण्यासाठी खर्ची घातला त्याविषयी मला कांही वाईट वाटले नाही, परंतु माझा यत्न सफळ झाला नाही म्हणून मात्र वाईट वाटते.'

विधवा दु:ख दर्शनासाठी लिहिलेल्या या कादंबरीपासूनचे उत्पन्न 'नवरा जिवंत असूनही जी वैधव्यात पडली होती तिला सोडविण्यात खर्ची घातले याचे वाईट वाटत नसून माझा यत्न सफल झाला नाही याचे वाईट वाटते' या त्यांच्या उद्गारातील वैफल्य धर्मोपदेशकाचे नसून एका उद्विग्न पतिचे आहे.

पुस्तकाच्या विक्रीमधून आलेले दोनशे रुपये खटल्याच्या कामी उपयोगी पडले असे बाबांनी स्पष्टच म्हटले आहे. याचा अर्थच असा की, खटल्यासाठी पैसे उभे करावेत म्हणून त्यांनी ही कादंबरी लिहिलेली नाही. पोतदारांसारख्या मान्यवर संशोधकाने काढलेली दुलकी दुर्दैवाने मराठी वाङ्‌मयात जणू वज्रलेप होऊन बसली आहे.

## (ड) बाबांचे पत्नीविषयक वर्तन

बाबांची पत्नी त्यांच्या बाप्तिस्म्यानंतर त्यांचेजवळ रहायला राजी होती, पण वडिलांच्या सांगण्यानुसार ती मुंबईला निघून गेली. तिने नांदायला

यावे म्हणून बाबांनी प्रयत्न केले. चार वर्षानंतर तिने आईवडिलांचा अटकाव आहे असा निरोप दिला. म्हणून कोर्टात फिर्याद करून बाबांनी तिला जज्जापुढे पाचारण केले. तिथेही तिने नन्नाचा पाढा लावला. पत्नीला परत आणण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर त्यांनी रीतसर घटस्फोट घेतला व ते इ.स.१८६० मध्ये ख्रिश्चन मुलीशी विवाहबध्द झाले. त्यानंतर पहिली पत्नी त्यांना २ मे १८६२ या दिवशी मुंबईमध्ये भेटली, व मी तुमच्याकडे येण्यास तयार आहे असे सांगितले. तू नोकरी कर किंवा दुसरे लग्न कर मी तुला सहाय्य करेन परंतु ख्रिस्ती धर्मानुसार मी तुझा पत्नी म्हणून मात्र स्वीकार करू शकत नाही, असे बाबांनी सांगितले. परंतु ती नाराज होऊन निघून गेली.

## रा.ग.जाधव यांचा आक्षेप

बाबांचे हे पत्नीविषयक वर्तन व त्याचे त्यांनी केलेले वर्णन यासंबंधी रा.ग.जाधव यांनी आक्षेप घेतले आहेत.[50] " हिंदू माणूस असो वा ख्रिस्ती असो परंतु अशा माणसाची विवाहित पत्नी त्या विशिष्ट वा क्वचित स्थितीत त्याकडे पत्नीभावाने आधार याचित असते हा प्रसंग केवढा नाट्यपूर्ण आहे. श्रेष्ठ धर्मश्रध्दाही विचलित करून विभ्रांत करणारा हा अपूर्व व अघटित प्रसंग. विशेषत: रे.बाबांसारख्या अंतर्मुख(?)वृत्तीच्या व्यक्तिला हा किती प्रकर्षाने जाणवावा. परंतु या प्रसंगातील सगळे भावनासमर एका पाषाणी धर्मवृत्तीने व धर्मप्रवणतेने हा रे.बाबांनी जिरवून टाकले आहे."

## बाबांच्या वर्तन आणि वर्णनातील सत्यशोध

बाबांच्या वर्तनात व त्यासंबंधीच्या त्यांनी केलेल्या वर्णनात रा.ग. जाधवांना भावनेचा अभाव जाणवला आहे. बाबांमधील पतीवर त्यांच्यातील धर्मोपदेशकाने मात केली आहे. मनातील भावसमर पाषाणी धर्मवृत्तीने दडपून टाकले आहे असे त्यांना वाटते. भावनेचा हा अभाव त्या प्रसंगाच्या निवेदनात

असेल पण प्रत्यक्ष बाबांच्या मनातही होता असे म्हणणे धाडसाचे ठरेल. त्यांनी भावनेचे प्रदर्शनच काय पण दर्शन घडविणेही टाळले आहे असे म्हणणे योग्य ठरेल. शिवाय वर्तनातील सर्वच वस्तुस्थिती वर्णनात अवतरते काय, याचाही येथे विचार होणे जरूरीचे आहे.

एकदा घटस्फोट घेतल्यानंतर व दुसऱ्या पत्नीसह नव्याने संसारात पदार्पण केल्यानंतर पुन्हा पहिल्या हिंदू पत्नीला पत्नीधर्माने वागविणे हे बाबांच्या मनाला रूचणारे नाही. त्यांच्या एकंदर व्यक्तिमत्त्वाशी त्यांचे हे वर्तन सुसंगतच आहे. `एक अबला आश्रय मागण्यासाठी आली` या मानवतावादी भूमिकेतून विचार करतनाही आढळते की, बाबांनी आपली सहानुभूती गोठविलेली नाही. त्यांनी तिला आसरा नाकारलेला नाही, फक्त पत्नीभावाने तिच्याशी वागण्यात असमर्थता प्रकट केली आहे. ज्या बाबांनी आपल्या आयुष्यातील सर्वच निर्णय स्वमनाला साक्षी ठेऊन घेतले, त्यांना या प्रसंगात तरी लोकापवादाची भीती बाळगण्याचे कारण नव्हते. जे घडले ते त्यांनी तटस्थपणे सांगितले आहे. आत्मचरित्र ही कलाकृती असली तरी तिला खरेपणाची बंधने असतात. नाट्यपूर्ण प्रसंग म्हणून त्याचे भावपूर्ण चित्रण करावे ही रा.ग.जाधवांची अपेक्षा योग्य आहे काय ? याचा विचार आत्मचरित्राचे बाबतीत केला पाहिजे.

सारांश, बाबांचे पत्नीविषयक वर्तन त्यांच्या एकंदर व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत आहे. त्या वर्तनाच्या वर्णनात मात्र त्यांनी अलिप्ततेचा जाणवण्यासारखा ठसा उमटविला आहे.

## शै ली

### व्यक्तिमत्व आणि शैली

`अरूणोदया` मध्ये बाबा पदमनजी हे ख्रिस्ती धर्माच्या श्रेष्ठतेने भारावून

जाऊन गतजीवनाचे सिंहावलोकन करीत आहेत. म्हणूनच त्यांच्या शैलीचे विश्लेषण त्यांच्या गतजीवनाच्या आधारे केले पाहिजे. शैली ही मनोवृत्तीवर अवलंबून असते व मनोवृत्ती ही विशिष्ट परिस्थितीमुळे संस्कारित होत असते. बाबांच्या शैलीवरही फ्रीचर्च विद्यालयातील शिक्षणपध्दती, रे. विल्सन, रे.शेषाद्री इ. ख्रिस्ती मिशन-यांचा सहवास, द्रव्यार्जनासाठी पत्करलेला मिशन स्कूल मधील शिक्षकी पेशा, उपजीविकेसाठी केलेला ट्रॅक्ट सोसायटीसाठीचा ग्रंथनिर्मितीचा उद्योग इ.बाबींचा परिणाम झाला आहे.

म्हणूनच असे म्हटले जाते की, ज्या परिस्थितीत लेखकाचे व्यक्तिमत्व घडले, त्या परिस्थितीशी, तिच्या लेखकावरील संस्कारांशी शैली निगडित असते. शैली विचारांवर अवलंबून नसते. एकच विचार प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावाप्रमाणे भिन्न मार्गांनी, भिन्न रूपांतून मांडला जातो. म्हणून शैलीमधून लेखकाच्या स्वभावाचे आविष्करण होते. `मनामध्ये विचार करून मत ठरविण्याची पध्दतीच स्वभावावर अवलंबून असल्याने ज्या पध्दतीने विचार केला जात असेल त्याच पध्दतीने तो लोकांपुढे मांडला जातो म्हणूनच भाषाशैलीतून लेखकाचा स्वभाव ओळखला जातो.` या विधानाचे [५१] प्रत्यंतर `अरुणोदया`तून येते.

धार्मिक प्रेरणेने जीवन जगणे आज कुणाला गैर वाटेल हा ज्याच्या त्याच्या वाटण्याचा भाग आहे. परंतु धर्मावर श्रध्दा ठेवून जगणारी काही माणसे असतात. बाबा यापैकीच एक होते. ख्रिस्ती धर्मावरील या आत्यंतिक श्रध्देचे रंग त्यांच्या व्यक्तिमत्वाला लाभले आहेत. यामुळेच `अरुणोदया`च्या आशयाप्रमाणे शैलीचेही रूप निश्चित झाले आहे.

प्रांजळपणाचे प्रतिबिंब
-----------------

प्रांजळपणा हे बाबांच्या व्यक्तिमत्वाचे एक प्रमुख अंग असल्याने त्याचे प्रतिबिंब बाबांच्या शैलीमध्ये ठायी ठायी पडले आहे. हातचे राखून न ठेवता बाबा

सर्व काही प्रामाणिकपणाने सांगत जातात. त्यांच्या मनात ख्रिस्ती धर्माविषयी आत्यंतिक श्रध्दा असली तरी ते त्यासाठी प्रामाणिक कथनाला छेद देत आहेत असे वाटत नाही. ख्रिस्ती धर्माविषयी एकांतिक व काहीशा अतिरेकी श्रध्देचे वर्णन, कोणी काय म्हणेल याचा विचार न करता त्यांनी प्रांजळपणाने केले आहे. पहिल्यांदा मुंबईहून बेळगावास आल्यानंतर त्यांना अनेक वाईट सवयी लागल्या होत्या. त्याबद्दलचा उल्लेख [५२] त्यांच्या मनाच्या प्रामाणिकपणाचा द्योतक आहे. फ्रीचर्च विद्यालयातील रे. शेषाद्रिसारख्या `बाटलेल्या` ब्राम्हणाच्या वर्गात शिक्षण घेण्यास बाबा नाराज असतात. रे. शेषाद्रि यांच्याबद्दलची ही प्रतिक्रियाही ते सहजपणे नोंदवितात असे वाटते.

धार्मिक आचरण व त्याला विसंगत असे एकमेकांचे अनिष्ट चिंतन परस्परातील भांडणे ही हिंदू कुटुंबाची स्थिती आहे. असे जरी त्यांना वाटत असले तरी, `सर्व हिंदू कुटुंबाची अशी स्थिती असते असे माझे म्हणणे नाही. तर जो प्रीतीचा व शांतीचा अंश हिंदू कुटुंबात असतो, तो त्यांच्या विवेकाचे, सुस्वभावाचे साधुसंतांच्या बोधपर ग्रंथवाचनाचे फळ होय. [५३] ही `ख्रिस्ती बाबां`ची कबुली त्यांच्या प्रांजळ स्वभावाची द्योतक आहे.

स्वत:च्या मनात धर्मांतरापूर्वी चाललेल्या वादळाचे दर्शन त्यांनी एका ख्रिस्ती मित्राला लिहिलेल्या पत्रात घडविले आहे. आईवडिलांबद्दलच्या उत्कट प्रेमामुळेच मी ख्रिस्ती धर्म स्वीकाराचा निश्चय विसरतो असे त्यांनी तेथे म्हटले आहे. स्वमनात चाललेला तत्त्व आणि भावना यामधील संघर्ष व निर्णय न घेण्याची स्वत:ची कुवत हे सारे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

म्हणूनच त्यांच्या मनाच्या प्रांजळपणाचे हे प्रतिबिंब त्यांच्या शैलीचेही महत्वाचे वैशिष्टय बनले आहे.

प्रसंग चित्रण

बाबांनी आपल्या पुर्वायुष्यातील धर्मांतराची कहाणी विविध प्रसंगांच्या आधारे सांगितली आहे. हे छोटे मोठे प्रसंग या कहाणीत इतके समरस झाले आहेत की, ब-याच वेळा त्यांचे स्वतंत्र अस्तित्व जाणवत नाही. तरीही प्रसंग चित्रणातील बाबांचे कौशल्य ध्यानी आल्यावाचून राहात नाही.

जेव्हा पदमनजींची बदली एडनला झालेली असते तेव्हा `आदन स्त्रीराज्याजवळ आहे ' असे बाबांनी सांगितल्यावर त्यांचे आजोबा मुलाविषयीच्या काळजीने धावून जातात आणि त्यांना तापच भरतो. बाबा हा गंमतशिर प्रसंग जसा रंगवितात, तसाच मुंबईला जात असताना एके ठिकाणी लोहाराच्या भात्या-वरील ठिणगीमुळे गावक-यांच्या झोपडया पेटून कसा हाहा:कार उडतो याचेही जिवंत चित्रण करतात.

फ्रीचर्च विद्यालयात बाबा बायबल मास्तर होते. `अहो कष्टी तुम्ही सर्व मजकडे या ' या ओवीचा अर्थ सांगत असताना, ते आणि त्यांचे विद्यार्थी कसे सद्‌गदित झाले,गुरुशिष्य एकाच आध्यात्मिक पातळीवर कसे आले. हा शब्दा-पलीकडचा अनुभव त्यांनी शब्दबद्ध केला आहे. माल्वण येथे श्रीधर लाडकोबा यांच्या घरी बाबांना पटत नसलेले धर्मकृत्य आचारिण्याचा प्रसंग ओढवतो. एका बाजूला स्वत:ची तत्वनिष्ठा तर दुस-या बाजूला वडिलांची प्रतिष्ठा या कैचीत ते सापडलेले आहेत. मनातील तणावाचे चित्रण त्यांनी या ठिकाणी केले आहे.

`अरुणोदयातील हे सारेच प्रसंग बाबांनी मोठ्या उत्कटतेने रंगविले आहेत. परंतु बाबांचे प्रसंगचित्रण प्राय: निवेदनाच्याच पातळीवर राहाते. अगदी क्वचित ठिकाणी त्यांनी संवादांचा उपयोग केला आहे. सदर प्रसंग चित्रणावर त्यांच्या व्यक्तिमत्वातील गांभीर्य, अंतर्मुखता, वैचारिक समतोल, भावनेचा कोरडेपणा या वैशिष्ट्यांचा जाणवण्यासारखा प्रभाव पडला आहे.

निवेदन

'अरुणोदया' तील बाबांच्या निवेदनाचा विचार करताना जाणवते की, वाचकाला विश्वासात घेऊन त्याच्यापुढे आपले अंत:करण खुले करण्याची बाबांची हातोटी काही विलक्षणच आहे. बाबांना अभिप्रेत असलेला आशय त्यांच्या पारदर्शक निवेदनातून सहजपणे प्रकट होतो. त्यांच्या निवेदनात भडक-पणाचा अभाव आहे. भाषा सामान्यत: सोपी आणि परिचयातील वापरण्याची दृष्टी आहे. निवेदन सोप्या, सरल, छोट्या व वाक्यांनी युक्त आहे. अशा वाक्यांनी युक्त असलेले निवेदन कोणताही प्रसंग, मन:स्थिती, वातावरण सहजरित्या उभे करू शकते. प्रसंगाचा सविस्तर तपशील देण्याची बाबांची वृत्ती आहे. तपशील, माहिती देताना जेथे निवेदनात खंड पडण्याची शक्यता वाटली, तेथे त्यांनी ती माहिती तळटीपांमध्ये दिली आहे.

हे निवेदन स्थ, तटस्थ, काहीसे कोरडे आहे. शिवाय अलंकरणापासून मुक्त आहे. मोहक शब्दांची योजना, आकर्षक वाक्य रचना, कल्पनाविलास यांचा सोस बाबांना नाही. परंतु फ्रीचर्च विद्यालयातील वातावरणामुळे स्वत:ची आध्यात्मिक मन:स्थिती कशी पालटत चालली त्याचे वर्णन बाबांनी उत्प्रेक्षा,उपमा व रुपकाद्वारे केले आहे, 'माळी जसा बागांतील रान उपटून टाकून त्याच्या जागी उत्तम बीज पेरितो, तद्वत पवित्र आत्मा माझ्या अंत:करणात कार्य करू लागला, केवळ अज्ञानाच्या मुळाचे रान उपटले जाऊन माझे मत स्वच्छ होत चालले इतकेच नाहीतर देवाचे वचन रूप बीज त्यांत पेरले जाऊन ते उगवू लागले.'[५४] अशी अलंकारिक रचना त्यांनी क्वचित प्रसंगी केली असली तरी ती त्यांची स्वाभाविक प्रवृत्ती नाही.

ख्रिस्ती धर्माची तत्वे हाडीमांसी घट्ट रुळल्यानंतर आपल्या धर्मांतराची कहाणी बाबा सांगत आहेत. या वस्तुस्थितीचे विविध परिणाम त्यांच्या निवेदनावर झाले आहेत. उपदेशाचे तात्पर्य आशयाशी न चुकता जोडण्याची वृत्ति

यामधूनच जन्मली आहे. एका साध्याच प्रसंगाद्वारे हे ध्यानी येते. डॉ. मिचेल यांच्या निवासस्थानी बाबा धर्मशास्त्र शिकण्यासाठी जात असत. त्यांचा एक मित्र त्यांना तेथे नेहमी मिठाई देत असे. या प्रसंगावर भाष्य करताना बाबा म्हणतात, `या मिष्टान्नापेक्षा मला शास्त्राभ्यास विशेष गोड लागे, व अंत:करण संतृप्त झालेले असता मी घरी येत असे, कारण देवाचे शास्त्र मधापेक्षा गोड (बायबल, जुना करार, दावीदाची गीते: ११९, १०३) आहे, ह्या शास्त्र-वचनाचा अनुभव मला त्याकारणापासून देवाच्या कृपेने येत चालला होता.'[५५]

त्यांनी जागोजागी बायबलमधील वचने, ख्रिस्ती वाङ्मयातील संदर्भ उद्धृत केले आहेत. मुंबईस प्रथमत: जाताना याकोबाच्या खटल्याप्रमाणे बायका व लेकरे बरोबर होती असे ते सांगतात.[५६] वडिलांना दिलेली शपथ हेरोद राजाच्या शपथेप्रमाणे अयोग्य होती असे त्यांना वाटते.[५७] एका मित्राला लिहिलेल्या पत्रात ते देवाने लुथरास वर्म्स गांवी धैर्य दिले तसे मला द्यावे असे सांगतात.[५८] बाबांनी अशाप्रकारे भूतकालीन घटना, मन:स्थिती यांवर ख्रिस्ती संदर्भांचे सहाय्य घेऊन, सद्य:कालीन मन:स्थितून भाष्य केले आहे. एडनला दुसऱ्यांदा जाणे रद्द होणे व फ्रीचर्च विद्यालयात प्रवेश घेणे या घटनांकडे `हे ईश्वरी सूत्राकडून झाले' या ईश्वरी पूर्वनियोजन कल्पनेच्या दृष्टीकोणातून पाहिले आहे.[५९]

जीवनातील महत्वाच्या, गंभीर प्रसंगातही त्यांचे निवेदन अलंकारिक, कृत्रिम होत नाही. छोट्या छोट्या वाक्यांतून त्या प्रसंगातील भावना वाचकांच्या हृदयापर्यन्त पोहोचविण्यात ते यशस्वी होतात. रे. टेलरांच्या घरी गेलेल्या बाबांना परत फिरविण्यासाठी त्यांची आई तेथे येते, हा बाबांच्या जीवनातील एक महत्वाचा व मायेच्या कसोटीवर त्यांची तत्वनिष्ठा पणाला लावणारा प्रसंग आहे. त्याचे वर्णन बाबा करतात, `दुसरे दिवशी माझी मातोश्री माझ्या सर्व भावंडां सुध्दा मला पाहण्यास व परत नेण्यास आली. ही प्रथमची भेट फार दु:खाची होती. तिचे वर्णन करिता येत नाही. परंतु त्या समयी प्रभु माझ्याजवळच

असून मला धीर देत होता. जर त्यावेळी प्रिय आप्तांच्या शोकाने माझे अंत:करण द्रवले असते तर क्वचित मी परत गेलो असतो, परंतु तसे न होता मी स्थिर राहिलो. आईची, आजीची व सर्वांची बोलणी ऐकून घेतली, व त्यास जी उत्तरे द्यायची ती थोडक्यांत दिली. पुष्कळ वेळेपर्यन्त बोलणे झाल्यावर माझा दृढ निश्चय पाहून आईने मोठा हंबरडा फोडून मला आणि टेलरसाहेबाला शिव्याशाप देऊन बंगल्यांतून पाय काढिला. तो तिचा आकांत व आक्रोश माझ्या कानांतून व डोळ्यांतून बहुत दिवस गेला नाही. सर्व मंडळी निघून गेल्यावर मला मोठे रडे कोसळले, मी एकटाच आपल्या खोलीत होतो.' [६०] या प्रसंगातील करुणारम्य भावनाट्य प्रकटविण्यास बाबाचे निवेदन यशस्वी झाले आहे.

बाबाचे निवेदन अनेकदा मिशनरी वळणावर जाते. भडकपणाचा अभाव, भाषा सोपी, परिचयाची, इंग्रजीच्या धाटणीचे अनुसरण करणारी आहे. ' मी इतका अशक्त आहे की, मला अग्नीच्या परीक्षेत उभे राहण्याची शक्ति नाही. तथापि माझी अशी आशा आहे की, माझ्या अशक्तपणांत देवाची शक्ति पूर्ण होईल व माझ्या अशक्तपणाकडून मी त्याचा गौरव करीन.' [६१] ' हे देवा माझ्या प्रभु, तू मज नाश पावणाऱ्या पाप्यावर जी दया केलीस तिजबद्दल मी तुझे उपकार मानितो.' [६२] यांसारखी वाक्यरचना मराठमोळ्या ढंगापेक्षा वेगळी, इंग्रजी वळणाची असल्याने ती कृत्रिम वाटते.

काही इंग्रजी शब्दांचे बाबांनी केलेले रुपांतरही वैशिष्ट्यपूर्ण आहे. आदन ( Aden ), इस्टाकीन ( Stockings ) हपिस ( Office ), कप्तान ( Captain ) , सोसैटी ( Society ), समन ( Summons ), त्राक्ट ( Tract ), म्याघझिन ( Magazine ) हे काही शब्द उदाहरणादाखल म्हणून सांगता येतील. बाबांनी वापरलेले काही वाक्प्रचार आज प्रचारातून गेल्यामुळे वैशिष्ट्यपूर्ण वाटतात. टाहो घेणे, पुकारा होणे, गिल्ला करणे, सख्यत्व करणे इ. अनेक वाक्प्रचार बाबा जागोजागी वापरतात व आशय अधिक

सुस्पष्ट करतात.

कुणाला चुकीची वाटो, वा कोणी वाटो-बाबांच्या व्यक्तिमत्वाला एका विशिष्ट विचाराची बैठक आहे. म्हणूनच त्यांना आपल्या विचाराच्या स्पष्टीकरणासाठी तर्कशुध्द शब्दांची ओळ योजत बसण्याची गरज पडत नाही. `अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी` या न्यायाने मनातला आशय त्यांच्या निवेदनात सहजपणे उतरत जातो. भाषेची सफाई त्यांना कदाचित साधली नसेल परंतु मनाच्या नम्रतेचे, ईश्वर विषयक उत्कट श्रध्देचे प्रतिबिंब त्यांच्या शैलीत पडलेले आहे. म्हणूनच प्रा.गं.बा. सरदारांना बाबांच्या शैलीत `एक त-हेचा प्रेमळपणा,` `एक त-हेची स्वाभाविक गोडी` जाणवते.[६३]

शैलीचे श्रेष्ठत्व परिणामात आहे
-------------------------

जे एका माणसाच्या व्यक्तिमत्वामुळे अवतरलेले असते. त्यासंबंधीचे सर्वांना लागू पडतील असे स्थूल निकष बांधणे अवघड आहे. कारण शैली म्हणजे एका व्यक्तिमत्वाचा तितकाच व्यामिश्र अविष्कार असते. शैलीचा वाचकमनावरील परिणाम हा मात्र तिच्या मूल्यमापनाचा निकष ठरू शकतो. विलक्षण सुबोधपणा हा `अरूणोदया`च्या शैलीचा लक्षणीय विशेष म्हटला पाहिजे. ही शैली बाबांना अभिप्रेत असणारा आशय तितक्याच समर्थपणे वाचकमनापर्यन्त पोहोचविण्यात यशस्वी होते. यामध्येच तिचे यश सामावलेले आहे.

आत्मचरित्राच्या निकषावर
====================

लेखनहेतूपलीकडे पाहोचलेले `अरूणोदय`
-------------------------

धर्मांतराची कहाणी सांगण्याच्या उद्देशाने `अरूणोदया`चा जन्म झाला असला तरी त्यातील उत्कटता व प्रांजळता यामुळे ते त्याच्या प्रचारकी-

पणाच्या जन्महेतूपलीकडे पोहोचले आहे.

`अरूणोदया` च्या लेखनाच्या निमित्ताने बाबा सुमारे चाळीस वर्षांपूर्वीच्या जगात जगू पाहातात. मोठ्या तल्लीनतेने त्या जगाचे व जगातील आपले प्रतिबिंब न्याहाळतात. बाबांमधील कलावंत असे करीत असताना प्रचारकाची भूमिका दूर ठेवून आत्मप्रत्ययाने नटलेला भूतकाळ साकार करतो. त्या काळातील धार्मिक जीवन, नीतीची धर्मापासून झालेली फारकत, शैक्षणिक वातावरण, तत्कालीन व्यक्ती, इ.चा पट विणतो. स्वजीवनाविषयक तपशिलाच्या प्रचंड पसा-यात बाबा उभे आहेत आणि पूर्वानुभवांची निवड व रचना धर्मविषयक जिज्ञासेच्या वा तिच्या संक्रमणाच्या संदर्भात करीत आहेत. इथे तपशिलाच्या उतरंडी रचल्या जातात तेव्हा एखादे पुस्तक इतिहास म्हणून मान्यता पावेल. परंतु खरे आत्मचरित्र म्हणून ते मान्यता पावू शकणार नाही. बाबा तपशिला-साठी तपशील देत नाहीत. त्यांनी दिलेल्या अर्थपूर्ण तपशिलामुळे, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे रसायन कसे तयार झाले हे समजून येते. हिंदू धर्माचारातील कर्म-कांडाचे प्राबल्य, त्यामधील नैतिक विसंगती इ. बद्दलच्या त्यांच्या प्रतिक्रियांमुळे तपशील जिवंत होऊन जातो.

या स्वचरित्राला `स्व`ची बाधा झालेली नाही. आत्मगौरव आणि आत्मसमर्थन या दोषांमुळे बहुतांश आत्मचरित्रे जशी डागळली जातात तसे `अरूणोदया` चे बाबतीत घडत नाही.

<u>सत्यदर्शनाचे स्वरूप</u>

कोणताही माणूस स्वत:ला जितके ओळखतो तितके त्यास कोणीही ओळखत नाही. म्हणूनच आत्मचरित्रातील सत्यशोधन अधिक विश्वासार्ह असते अशी अपेक्षा ठेवणे अनाठायी होणार नाही. परंतु स्वत:विषयीचे संपूर्ण सत्य सांगणे ही वरवर दिसते तितकी सोपी गोष्ट नसते. सत्याचे दर्शन घेऊन

लेखक त्याला जेव्हा शब्दाकार देतो, तेव्हा त्याचेकडून त्यामध्ये बदल होत असतो. बाबांच्या बाबतीत हेच घडले आहे. शिवाय ख्रिस्ती धर्मशास्त्रातील ईश्वरी पूर्वनियोजन कल्पनेचा चष्मा त्यांनी चढविल्यामुळे भूतकाळातील वास्तव, यथारूप अवलोकिण्यात व ते प्रकट करण्यात त्यांच्यावर काही मर्यादा पडल्या आहेत. या मर्यादांचा विचार करताना रा.ग.जाधव म्हणतात, [६४] ` सत्य सांगण्याच्या इर्षेने बाबांनी आपले विचार आत्मवृत्ताद्वारे वाचकांना प्रत्यक्षपणे, प्रकटपणे पटवण्याचा प्रयत्न केला. आपल्या धर्मांतराचे अनुभवदर्शन घडविण्याऐवजी त्याचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला. जे धर्मांतर आपण स्वीकारले ते न्याय्यच होते हे बौध्दिकदृष्टया वाचकांच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न केला.'

बाबा एका विशिष्ट भूमिकेमधून भूतकालीन अनुभवांची पुनर्रचना करीत आहेत हे उघडच आहे. तरीही ते सत्याची मोडतोड करीत आहेत, त्याला विकृत बनवत आहेत असे वाटत नाही. बाबा काहीतरी गळी उतरविण्याचा प्रयत्न करीत आहेत हे रा.ग.जाधवांचे म्हणणे अप्रस्तुत वाटते.

इतरांविषयीचे सत्य सांगणे हे अतिशय जबाबदारीचे काम आहे याची बाबांना जाणीव आहे.[६५] आणि या जाणिवेतून लिहिणारे बाबा हेतुत: सत्यापलाप करीत नाहीत.

भूतकाळाची पुनर्निर्मिती करण्याचे आत्मचरित्रकाराचे साधन म्हणजे त्याची स्मरणशक्ती होय, परंतु स्मरण हे बरेच निसरडे असते. म्हणूनच त्याच्याकडून व्यक्त झालेले सत्य अपूर्ण वा अर्धवट असण्याची शक्यता असते. असे असले तरी हाती लागलेले सत्य आत्मचरित्रकाराने प्रांजळपणे वाचकांपुढे मांडले पाहिजे. एखादा प्रांजळपणे सारे काही सांगत असला की सहसा असत्यकथन करीत नाही.आणि म्हणूनच बाबा आपले दोष कबूल करतात, परनिंदेकडे फिरकतही नाहीत. `स्मृतिचित्रे` त आत्मसमर्थनाचा एखादा अपवाद असला, तरी हेतुत: केलेले असत्यकथन आढळत नाही. म्हणूनच `स्मृतिचित्रे` त फारशी कलात्मकता

नसली, त्यात अतिरेकी धर्मश्रध्देची छाया जाणवत असली, लेखनामागे साहित्यबाह्य हेतूची उपस्थिती असली तरीही या मर्यादांची जाणीव ठेवून वाचकाला बाबांच्या प्रांजळपणामुळे या लेखनाशी समरस होता येते.

## तटस्थता आणि समरसता

मानवी जीवन ही एक अखंड प्रक्रिया असते. या प्रक्रियेतील टप्प्यावर थांबून आत्मचरित्रकार तिजकडे पाहात असतो. असे करताना तटस्थता नसेल तर आत्मकथन सदोष होते. वासनेची हकालपट्टी व भावनेची समरसता यांच्या समतोलातून ताटस्थ्य निर्माण होते. धर्मांतरानंतरची पत्नीविषयक हकीकत सांगताना बाबांच्या लेखनात ताटस्थ्याचा अनुभव येतो. आत्मसमर्थन करण्याची त्यांना गरजही भासत नाही. हिंदू आचार विचारांचे विश्व साकार करीत असताना ते तटस्थ राहातात त्यामुळे पूर्वग्रहदूषितता व छिद्रान्वेषी वृत्ती या दोषांपासून बाबा आणि त्यांचे आत्मचरित्र दूर राहाते.

तटस्थता म्हणजे भावनिक कोरडेपणा नव्हे, तर केवळ निर्लेप वृत्ती होय, हे बाबांचे आत्मकथन वाचन असताना सातत्याने जाणवत राहाते. रे. टेलर यांचे घरी गेल्यानंतर-आत्मक्लेश करणारी आई त्यांना अस्वस्थ करते. आईच्या गाढ मायेचा व क्षमाशक्तीचा अनुभव त्यांना हेलावून टाकतो. मायलेकरांच्या ताणल्या गेलेल्या संबंधांवर बाबांचा या निवेदनामधून प्रकाश पडतो. भावनिक आवर्तात सापडलेले बाबा इतरांनाही या प्रसंगाशी सहस्वादी करू शकतात. कारण ते तटस्थतेचा समरसतेशी यथोचित मिलाफ करू शकतात.

## चित्रण आणि चिंतन

आपल्या भोवतालच्या जीवनाचे रूप कसे होते हे पाहून आत्मचरित्रकार

असे त्याचे वर्णन करीत असतो तद्वतच त्या त्या वेळी जीवनाचे रूप ' स्व ' ला कसे जाणवले, त्याच्याशी ' स्व ' चा कोणता आणि कोठवर संबंध आला हे ही अंतर्मुख होऊन न्याहाळत असतो. ' अरूणोदया ' त अशी कित्येक स्थळे आहेत की, घटिताचे चित्रण व त्याविषयीचे अंतर्मुख चिंतन अशी दुहेरी प्रक्रिया बाबा करताना आढळतात. बेळगावातील मारूती आळीत ब्राम्हणांच्या मोठमोठ्या समाराधना होत. तेथे महार, मांग, डोंबारी उष्ट्या खरकट्याच्या आशेने जमत असत. याबद्दलचे वर्णन केल्यानंतर बाबा पुढे म्हणतात, [६६] ' ब्राम्हणांस यथास्थित तुपपोळ्या का मिळतात व भिका-यांच्या पदरी त्यांच्या उष्ट्या पत्रावळी का पडतात हे माझ्या लक्षात त्यावेळी आले नाही. आले नसेल तर देवानेच त्यांस ह्या नीच स्थितीत घातले आहे असे मात्र वाटले असेल. '

प्रत्यक्ष धर्मांतरापूर्वी बाबा ख्रिस्ती धर्मावर पूर्ण श्रध्दा ठेवित होते, तरी सामाजिक दडपण, जातिबहिष्काराची भिती, कुटुंबियांविषयीचे प्रेम या कारणांमुळे ते धर्मांतराच्या निर्णयापर्यन्त पोहोचू शकलेले नव्हते. मनाच्या या डळमळीत अवस्थेचे चित्रण करून बाबांनी जे चिंतन केले आहे ते त्यांच्या अंतर्मुखतेचे द्योतक आहे. बाबा म्हणतात, [६७] ' मी आपल्या आईबापांवर व कुटुंबातील दुस-या मनुष्यांवर जी प्रीति करितो तिच्यामुळे मी आपला निश्चय विसरतो, हे ही मी कबूल करितो. ' बाबांनी ' अरूणोदया ' त चित्रण व चिंतानाचा समतोल साधला आहे.

## को-या जागांमधील अर्थपूर्णता

गतजीवनाचे चित्रण करताना बाबा काही को-या जागा ठेवतात. ' अरूणोदया ' तील या को-या जागा मोठ्या सूचक, बोलक्या व अर्थपूर्ण आहेत. रे. टेलर यांच्या बंगल्यातून पदमनजी यांनी बाबांना घरी नेणे, ह्या प्रसंगाचे निवेदन करताना त्यांनी ठेविलेली कोरी जागा अर्थ पूर्ण आहे. पदमनजी पहाटेसगाडी घेऊन

रे. टेलर यांच्या बंगल्यावर जातात व गड्याच्या हाती बोलावणे पाठवितात. या पुढील प्रसंगाचे कथन बाबा असे करतात, `मला त्यांनी जवळ घेऊन थोडावेळ गाडी उभी ठेवून हे काय केलेस ? असे बोलून अश्रू गाळले. नंतर `आता घरी चल` असे म्हणून चाकरास गाडी हाकायास सांगितली.`[६८] एवढेच लिहून बाबा येथे थांबतात. या पुढील रिकामी जागा पदमनजींच्या मनातील वादळ प्रकटविण्यास समर्थ आहे. त्यांचे बाबांबद्दलचे ममत्व, तरीही बाबांच्या वर्तनाबद्दल वाटणारी नापसंती, धर्मांतराच्या गंभीर परिणामांची त्यांना वाटणारी धास्ती, संयम, समजुतदारपणा, प्रसंगावधान या पदमनजींच्या मनातील कितीतरी छटांचे वर्णन जरी बाबांनी केले नसले तरी वाचकांना हे सारे जाणवते. दुसरे एक असेच स्थळ म्हणजे, बाबांच्या पत्नीचा पश्चाताप व त्यामुळे त्यांच्या मनात निर्माण झालेले भावनांचे आवर्त. या ठिकाणी बाबांनी फारसे स्पष्टीकरण केले नसले तरी त्यांच्या मौनातून बरेच काही उमगते. असहाय्य पत्नीबद्दल वाटणारी आत्मीयता, स्वत:बद्दलची अगतिकता, संयम राखण्याचा केलेला प्रयत्न, हे सारे आपणापुढे उलगडते. या सा-या को-या जागांकडे पाहून म्हणावेसे वाटते की, एखाद्या ललित कृतीप्रमाणे आत्मचरित्रातही जेवढे सांगितलेले असते त्याहीपेक्षा अधिक सुचविलेले असते.

बाबांच्यामधील `कलावंता` ची किमया

आत्मचरित्र हे प्रत्यक्ष जीवन जगलेल्या व्यक्तीचे आत्मदर्शन असल्यामुळे ते वास्तवपूर्ण व जिवंत असते. आत्मचरित्रकार हा स्वत:च्या जीवनाचे प्रतिबिंब मागेवळून न्याहाळण्याचा प्रयतन करीत असतो, त्याचवेळी स्वत:चे व आवश्यक तेथे इतरांचेही सुसंगत चित्र साकार करण्याची धडपड करीत असतो. हे सारे प्रकट करीत असताना त्याचे निवेदन आपोआपच लालित्यपूर्ण होऊ लागते. स्वत:ला समजून घेण्याची बाबांची उत्कटता, अंतर्मुख वृत्तीने त्यांनी केलेले आत्मविश्लेषण, स्वत:कडे व इतरांकडे तटस्थतेने पाहाण्याची वृत्ती या सर्वांमुळे `अरुणोदया` ला लालित्याचे

रंग आले आहेत. म्हणूनच आध्यात्मिक पश्चातापातून दिलेला पापाचा कबुली-जबाब किंवा रूक्ष अनुभवाची जंत्री असे `अरुणोदया `चे रूप राहिलेले नाही. `अरुणोदया `त तत्कालीन समाज जीवनाच्या चैतन्यपूर्ण प्रतिबिंबा सोबतच बाबांच्या भावजीवनाचेही उत्कट चित्रण आढळते. मानवी मनाच्या विविधतेचा हा जिवंत आणि सखोल प्रत्यय पर्यायाने मानवी जीवनदर्शनच घडवितो. येथेच `अरुणोदय` लेखनहेतूच्या पलिकडे पोहोचले आहे. ही किमया बाबांच्यामधील प्रचारकाची नसून त्यांच्यामध्ये खोल दडलेल्या `कलावंता`ची आहे हे ध्यानी येते.

---o---

## संदर्भ - सूचि


१. प्रियोळकर अ.का. - रा.ब.दादोबा पांडुरंग
( प्रस्तावना )
के.भि.ढवळे प्रकाशन, मुंबई
आवृती पहिली १९४७, पृष्ठ ४९

२. बाबा पदमनजी - अरूणोदय
प्रस्तावना
बॉंबे ट्रॅक्ट ॲंड बुक सोसायटी, मुंबई
द्वितीयावृत्तीचे पुनर्मुद्रण १९५५, पृष्ठ ९

३. तत्रैव, पृष्ठ १०

४. तत्रैव, पृष्ठ १९०

५. तत्रैव, पृष्ठ १

६. मालसे, डॉ. स.गं. (अनु.) - साहित्य सिध्दांत
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई
आवृती पहिली मे १९८२, पृष्ठ ९१

७. बाबा पदमनजी, (प्रस्तावना) जुनि, पृष्ठ ९

८. तत्रैव, पृष्ठ १०२

९. तत्रैव, पृष्ठ ६

१०. तत्रैव, पृष्ठ ३४

११. तत्रैव, पृष्ठ ३०

१२. तत्रैव, पृष्ठ ७७

१३. तत्रैव, पृष्ठ १०१

१४. तत्रैव, पृष्ठ ७८

१५. तत्रैव, पृष्ठ ८८

१६. तत्रैव, पृष्ठ ७८,७९

१७. तत्रैव,

१८. धोंड, म.वा. - म-हाटी लावणी ( प्रस्तावना)
मौज प्रकाशन, मुंबई
आवृत्ती पहिली ऑगस्ट १९५६, पृष्ठ ५०

१९. टिकेकर,श्री.रा.(संपा.) - लोकहितवादींची शतपत्रे
सिटी बुक स्टॉल, पुणे २
आवृत्ती दुसरी १९६३, पृष्ठ १७५

२०. बाबा पदमनजी अुन्नि, पृष्ठ ७०

२१. तत्रैव, पृष्ठ ४६

२२. तत्रैव, पृष्ठ ६६

२३. तत्रैव, पृष्ठ ८०

२४. तत्रैव , पृष्ठ ९४

२५. तत्रैव, पृष्ठ ७१

२६. तत्रैव, पृष्ठ १०५

२७. तत्रैव, पृष्ठ १२१

२८. तत्रैव, पुरवणी, पृष्ठ २३६

२९. तत्रैव, पृष्ठ १२७

३०. तत्रैव, पृष्ठ १३५

३१. तत्रैव, पृष्ठ १४६

३२. तत्रैव, पृष्ठ ८

३३. तत्रैव, पृ ष्ठ १५०

३४. घोंड, म.वा. - ज्ञानोदय

१९७१ पृष्ठ ९

३५. बाबा पदमनजी मुनि, पृष्ठ ६५

३६. तत्रैव पृष्ठ १८३

३७. ज्ञानप्रकाश, ३० जून १८५६

३८. पाध्ये, प्रभाकर - टिकेकर, श्री.रा. - आजकालचा महाराष्ट्र
कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई
आवृत्ती पहिली १९३५, पृष्ठ २५०

३९. माडखोलकर, ग.त्र्यं. - विष्णु कृष्ण चिपळूणकर : काल आणि कर्तृत्व
ठाकूर आणि कंपनी, अमरावती
आवृत्ती तिसरी १९५४, पृष्ठ ६९

४०. बाबा पदमनजी मुनि, पृष्ठ १०५

४१. प्रियोळकर मुनि, पृष्ठ २४५

४२. ज्ञानप्रकाश, ३१ ऑगस्ट १८५४, पृष्ठ ४०६, ४०७

४३. वर्तमानदीपिका - ज्ञानोदय ५ सप्टेंबर १८५४ पृष्ठ २८७ वरून उद्धृत

४४. रानडे, गो.मो. - महाराष्ट्रातील समाजविचार
सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, नागपूर
आवृत्ती पहिली १९७१, पृष्ठ २७

४५. कीर, धनंजय - महात्मा जोतिराव फुले
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
दुसरी आवृत्ती १९७३, पृष्ठ ७०

४६. पोतदार, द.वा. - मराठी गद्याचा इंग्रजी अवतार
व्हीनस प्रकाशन, पुणे
आवृत्ती दुसरी १९५७, पृष्ठ ३९

४७. कुलकर्णी, वि.ह. -'मराठी कादंबऱ्या,' अर्वाचीन मराठी साहित्य
संपा. माने-पाटील, नेने. (१८७५-१९३५)
बडोदे विष्णु पांडुरंग नेने, समर्थ भारत पुणे
आवृत्ती पाहिली १९३५.

४८. भिंगारे, डॉ.ल.म. - कथा-कादंबऱ्या,' मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ४
(१८०० ते १८७४) संपा. रा.श्री.जोग
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचे प्रकाशन
आवृत्ती पहिली १९६५, पृष्ठ २११

४९. बाबा पदमनजी उक्त, पृष्ठ ४५

५०. जाधव, रा.ग. -'अरुणोदय नि वाचकांच्या समस्या'
नवभारत, एप्रिल १९६४, पृष्ठ ४५

५१. चाफेकर, श्री.ना. 'भाषा शैलीचे रहस्य', साहित्य आणि समाज
स्वत: प्रकाशित केले, २६४१३ शनिवार, ओंकारेश्वर रस्ता, पुणे २
आवृत्ती पहिली १९६५ पृष्ठ ४०

५२. बाबा पदमनजी उक्त. ४९

५३. तत्रैव, पृष्ठ ७७

५४. तत्रैव, पृष्ठ १०९

५५. तत्रैव, पृष्ठ ९२

५६. तत्रैव, पृष्ठ ४६

५७. तत्रैव, पृष्ठ १०४

५८. तत्रैव, पृष्ठ १२१

५९. तत्रैव, पृष्ठ ६३

६०. तत्रैव, पृष्ठ १६३

६१. तत्रैव, पृष्ठ १५५

६२. तत्रैव, पृष्ठ १६५

६३. सरदार, गं.बा. - अर्वाचिन मराठी गद्याची पूर्वपिठिका
मॉडर्न बुक डेपो, पुणे
आवृत्ती तिसरी १९७१, पृष्ठ ४५, १०४, ११९

६४. जाधव उनि.

६५. बाबा पदमनजी उनि. प्रस्तावना, पृष्ठ ९

६६. तत्रैव, पृष्ठ ३

६७. तत्रैव, पृष्ठ १२१

६८. तत्रेव पृष्ठ १६७

---०---